|| राष्ट्रहित || || उद्योग हित || || कामगार हित ||





# भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेश

## महाराष्ट्रातील कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांवर लक्ष वेधण्यासाठी

# कामगार आक्रोश मोर्चा

**महाराष्ट्र राज्य कामगार आयुक्त कार्यालय, बांद्रा BKC (पूर्व), मुंबई**

## गुरुवार दि. १६ एप्रिल २०२६

## मा. मुख्यमंत्री व कामगार मंत्री यांना विविध सलग्न संघटनांची एकत्रित निवेदने

# भारतीय मजदूर संघ

## सलग्नित संघटनांची निवेदने

- भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेश
- महाराष्ट्र राज्य घरेलू कामगार महासंघ
- महाराष्ट्र अंगणवाडी कर्मचारी संघ
- आशा व गटप्रवर्तक सेविका संघ
- महाराष्ट्र वीज कामगार महासंघ
- बांधकाम कामगार महासंघ
- महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ
- महाराष्ट्र राज्य विडी कामगार संघ
- महाराष्ट्र सुरक्षा रक्षक महासंघ
- महाराष्ट्र राज्य सहकारी बँक कर्मचारी महासंघ
- पुणे मेट्रो रेल कामगार संघ
- ठेकेदार कामगार संघ
- महाराष्ट्र राज्य लिपिक संघ
- नगरपरिषद महानगरपालिका कर्मचारी महासंघ महाराष्ट्र प्रदेश
- राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अधिकारी व कर्मचारी महासंघ
- भारतीय टॅक्सी चालक संघ
- नॅशनल ऑर्गनायझेशन ऑफ बँक ऑफिसर्स
- मुंबई पोर्ट ट्रस्ट मजदूर संघ
- महाराष्ट्र हॉकर्स संघ
- आरोग्य सेवा कर्मचारी महासंघ
- इंडियन एअरलाइन्स कर्मचारी संघ
- महाराष्ट्र वीज निवृत्त जेष्ठ नागरिक संघ
- वरिष्ठ नागरिक परिसंघ
- कोकण विभाग EPS - 95 पेन्शनर्स संघ
- महाराष्ट्र मोटार कामगार फेडरेशन

।। श्रम हीच आराधना ।।

# भारतीय मजदूर संघ, महाराष्ट्र प्रदेश
## Bharatiya Mazdoor Sangh, Maharashtra Pradesh

रजि नं. पी एन 2903 दि.4.4.97

कार्यालय : 25 इब्राहिम मॅन्शन, डॉ. आंबेडकर रोड, परेल, मुंबई 400 012 © 022 - 24713283/24709558
: mahabms55@gmail.com

**अध्यक्ष : ॲड. अनिल ढुमणे**
9850095017

**सरचिटणीस : किरण मिलगीर**
9860475847

दिनांक – २५.०३.२०२६

प्रति
मा. नामदार श्री देवेंद्रजी फडणवीस
मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य,
मंत्रालय मुंबई 32.

विषय - महाराष्ट्रातील कामगारांच्या दीर्घ काळापासून प्रलंबित व दुर्लक्षित असलेले प्रश्न आणि मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेशाच्या वतीने १६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११.०० वा. राज्य कामगार आयुक्त, बांद्रा मुंबई कार्यालयावर राज्यातील कामगारांचा मोर्चा.

महोदय,
महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्रीपदी आपण तिसऱ्यांदा विराजमान झाला आणि गतिमान शासन चालवत आहात याबद्दल आपले हार्दिक अभिनंदन. महाराष्ट्र राज्यातील विविध समाज घटक म्हणजे महिला, युवा , उद्योजक, शेतकरी, सहकार, आरोग्य, उद्योग, कला, क्रीडा, शिक्षण, गुंतवणूक, सार्वजनिक बांधकाम आदी सर्वच क्षेत्रात सरकार चांगले काम करत आहे. महाराष्ट्र राज्य एक ट्रिलियन इकॉनोमी बनण्याच्या दिशेने अग्रेसर आहे.

मात्र हे सर्व होत असताना कामगार वर्गाकडे सरकारचे दुर्लक्ष झालेले आहे अशी राज्यातील कामगार वर्गाची भावना झाली आहे. आपणांसह राज्याचे कामगार मंत्री देखील कामगारांच्या प्रश्नांमध्ये गांभीर्याने लक्ष देत नाही. कामगारांचे अनेक प्रश्न दीर्घकाळ प्रलंबित आहेत. धोरणात्मक निर्णय घेतले जात नाही. कामगारांच्या मागण्यांकडे आणि कायदेशिर हक्कांकडे दुर्लक्ष केले जाते. राज्यातील कामगारांचे शोषण वाढत आहे.

महाराष्ट्र राज्याचे सर्व विषयांचे धोरण आहे, मात्र कामगार विषयक धोरण नाही. मुख्यमंत्री , उपमुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी होत नाही. सरकारच्या कामगार विषयक व्यवहाराबद्दल भारतीय मजदूर संघ नाराज असून, समाजातील कामगार वर्गाकडे सरकारचे दुर्लक्ष आहे असे आम्हाला वाटते. कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत वारंवार पत्रव्यवहार करून, निवेदन देऊनही प्रश्न सुटलेले नाही. उलट आणखी गंभीर होत चाललेले आहे.

या सर्व विषयांकडे सरकारचं लक्ष वेधण्यासाठी, गुरुवार दिनांक १६ एप्रिल २०१६ रोजी भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेशाच्या वतीने महाराष्ट्र कामगार आयुक्त कार्यालय, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व ) मुंबई या ठिकाणी कामगारांच्या मोर्चाचे आयोजन करण्यात आलेले आहे. यानिमित्ताने विविध मागण्या आपणास आम्ही सादर करत आहोत. त्याच बरोबर आमच्या संलग्न संघटनांच्या वतीने त्या त्या उद्योगांच्या मागण्यांचे स्वतंत्र निवेदनही आम्ही आपल्या कार्यालयात सादर केलेलं आहे.

आमची अपेक्षा आहे की, या प्रश्नांकडे सरकारने लक्ष घालावे. मुख्यमंत्री म्हणून आपण एक उच्चस्तरीय बैठक त्या ठिकाणी घ्यावी. कामगार विषयक प्रश्न सोडवण्यासाठी निश्चित कालावधी ठरवून ते प्रश्न सुटतील असा कार्यक्रम निश्चित करण्यात यावा. कामगारांचे प्रश्न बाबत सरकारच्या विविध खात्यांमध्ये समन्वय ठेवून ते प्रश्न सुटावेत यासाठी प्रयत्न करावा.
सोबत मागणी पत्र.

सहकार्याची अपेक्षा धन्यवाद !
आपले

ॲड अनिल ढुमणे — किरण मिलगिर
अध्यक्ष — महामंत्री

प्रत माहितीसाठी रवाना -
मा. नामदार श्री आकाशजी फुंडकर कामगार मंत्री महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई.
मा. प्रधान सचिव , कामगार विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई
मा. कामगार आयुक्त महाराष्ट्र शासन , कामगार भवन BKC बांद्रा (पूर्व ) मुंबई.
मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, बांद्रा पोलीस स्टेशन , बांद्रा कॉलनी, मुंबई.

।। श्रम हीच आराधना ।।

# भारतीय मजदूर संघ, महाराष्ट्र प्रदेश

**Bharatiya Mazdoor Sangh, Maharashtra Pradesh**

रजि नं. पी एन 2903 दि.4.4.97

कार्यालय : 25 इब्राहिम मॅन्शन, डॉ. आंबेडकर रोड, परेल, मुंबई 400 012 © 022 - 24713283/24709558
: mahabms55@gmail.com

**अध्यक्ष : ॲड. अनिल ढुमणे** 9850095017

**सरचिटणीस : किरण मिलगीर** 9860475847

भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेशाच्या वतीने १६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११.०० वा. राज्य कामगार आयुक्त, बांद्रा मुंबई कार्यालयावर आयोजित राज्यातील कामगार मोर्चा बाबतचे मागणी पत्र -

## - मागणी पत्र -

१. बांधकाम कामगार मंडळातील बोगस नोंदणी रद्द करावी . बोगस आरोग्य तपासणी योजना बंद करण्यात यावी. योजनेत बोकाळलेला प्रचंड भ्रष्टाचार थांबवावा. तालुका स्तरावर नोंदी चालू ठेवण्यात यावी. विधानसभा निहाय स्थापन केलेल्या समित्या रद्द करण्यात याव्यात. या बाबत चर्चा करण्यासाठी स्वतंत्र बैठक आयोजित करण्यात यावी.

२. घरेलू कामगार कल्याण मंडळाला आर्थिक सहाय्य देण्यात यावे. बंद पडलेल्या योजना सुरू करण्यात यावी. सर्व जिल्ह्यात भांडी वाटप पूर्ण करण्यात यावे. मंडळाची सदस्य वयोमर्यादा ६५ वर्ष करण्यात यावी. घरेलू कामगार आरोग्य तपासणी करण्यात यावी.

३. सरकारी वीज कंपन्या, विविध महामंडळ, राज्य सरकार, नगरपालिका महानगरपालिका आदी मध्ये काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांचे होणारे शोषण थांबवण्यासाठी मध्यस्थ विरहित रोजगार यंत्रणा हरियाणा पॅटर्न प्रमाणे स्थापन करण्यात यावी. त्याबाबत स्वतंत्र बैठक आयोजित करण्यात यावी.

४. अंगणवाडी, आशा सेविका यांना कर्मचारी म्हणून घोषित करण्यात यावे. त्यांना वेतन , उपदान आदी कायम कामगारांचे लाभ देण्यात यावे.

५. प्रत्येक जिल्ह्यात कामगार राज्य विमा रुग्णालय सुरू करण्यात यावे. . ESI योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी. प्रत्येक MIDC क्षेत्रात कामगार राज्य विमा दवाखाना सुरु करण्यात यावा. ESI बाबत सविस्तर चर्चा करण्यसाठी उच्च स्तरीय बैठक आयोजित करावी.

६. गत १५ वर्षापासून प्रतीक्षेत असलेली ESI आणि EPF ची रिजनल कमिटी त्वरित स्थापन करण्यात यावी. त्यात भारतीय मजदूर संघाला पुरेसे प्रतिनिधित्व देण्यात यावे.

७. कामगार विभागाशी संबंधित विविध मंडळ आणि समित्यांचे त्वरित गठन कण्यात यावे. त्यात भारतीय मजदूर संघाला पुरेसे प्रतिनिधित्व देण्यात यावे.

८. महाराष्ट्र राज्य कामगार सल्लागार मंडळाची स्थापना करण्यात यावी. त्यात भारतीय मजदूर संघाला पुरेसे प्रतिनिधित्व देण्यात यावे.

९. महाराष्ट्रात Wage Code 2019 अंतर्गत बोनस कायद्यासाठी वेतन मर्यादा रुपये ४२०००/- करण्यात यावी.

१०. महाराष्ट्रात IR Code 2020 अंतर्गत कारखाना कामगार कपात, क्लोजर साठी दिली जाणारी नुकसान भरपाई ४५ दिवस प्रती वर्ष करण्यात यावी.

११. महाराष्ट्र किमान घरभाडे भत्ता अधिनियम १९८० नुसार देण्यात येणारे घर भाडे किमान १० % करण्यात यावे.

१२. दुकाने व व्यापारी अस्थापना कायदा लागू करण्याची मर्यादा कामगार संख्या ५ करण्यात यावी.

१३. सामाजिक सुरक्षा कोड 2020 मध्ये जाहीर केल्यानुसार असंघटित क्षेत्रातील कामगारांना सामाजिक सुरक्षा त्वरित लागू करण्यात यावी. त्यासाठी राज्याच्या अर्थ संकल्पात आर्थिक तरतूद करण्यात यावी.

१४. वेतन कोड 2020 नुसार नॅशनल फ्लोर मिनिमम वेजेस त्वरित जाहीर करण्यात यावे.

१५. किमान वेतन कायद्याअंतर्गत प्रलंबित असलेल्या विविध उद्योगांचे किमान वेतन त्वरित निर्धारित करण्यात यावे.

१६. खाजगी क्षेत्रातील कामगारांना मिळणारी EPS 95 पेन्शन किमान ७५००/- करण्यात यावी. हरियाना सरकार प्रमाणे राज्यातील EPS 95 पेन्शन धारकांना राज्यसरकार कडून दरमहा किमान २०००/- रुपये पेन्शन देण्यात यावे.

१७. कामगार राज्य विमा योजना कायद्याची वेतन मर्यादा ४२०००/- रुपये करण्यात यावी.

१८. भविष्य निर्वाह निधी १९५२ कायद्याची वेतन मर्यादा ३००००/- रुपये करण्यात यावी.

१९. राज्यांमध्ये विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १३३ नुसार त्रिपक्षीय करारांची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी. त्यानुसार कर्मचाऱ्यांच्या सेवा शर्ती, पेन्शन लाभ आणि नोकरीची सुरक्षा सुनिश्चित करण्यात याव्या. वीज वितरण क्षेत्रात समांतर परवाना फ्रेंचाइझी, पारेषण मधील TBCB प्रकल्प , निर्मिती मधील जलविदयुत केंदे खाजगी क्षेत्रास खुले करण्याचे धोरण , तसेच तिन्ही कंपन्यामध्ये छुप्या पद्धतीने चालू असलेले खाजगीकरण धोरण त्वरित रद्द करण्यात यावे.

२०. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत (NHM) काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना सरकारने घोषित केल्या प्रमाणे सेवेत कायम करण्यात यावे.

२१. सुरक्षा रक्षक मंडळांमध्ये नियमित भरती पोलीस खात्यामार्फत न करता मंडळामार्फतच करण्यात यावी. भरतीसाठीचे निकष पसारा कायद्या प्रमाणेच लागू करा. परिणामीत गार्ड नोंदणी करताना अटी शिथिल करण्यात यावी.

२२. बिडी कामगारांसाठी जाहीर केलेल्या किमान वेतनाची त्वरित अंमलबजावणी करण्यात यावी.

२३. RCF मुंबईमधील माथाडी कामगारांना RCF थळ कारखान्याप्रमाणे 16% वेतन वाढ करार लागू करण्यात यावा.

२४. माथाडी कामगारांच्या नोंदणीतील अडथळे दूर करून प्रत्येक माथाडी कामगाराची बोर्डात नोंदणी करण्यात यावी.

२५. मुंबईतील फेरीवाल्यांसाठी फेरीवाला धोरण लागू करावे. पात्र फेरीवाल्यांना ओळख पत्र व कोड देण्यात यावा. बंद व्यवसाय सुरु करू द्यावा.

२६. रिक्षा व टॅक्सी चालकांसाठी जाहीर केलेले सामाजिक सुरक्ष मंडळ त्वरित प्रत्यक्ष सुरु करण्यात यावे.

२७. राष्ट्रीयकृत, ग्रामीण आणि सहकारी बँकांमधील कर्मचारी व अधिकार्यांसाठी ५ दिवसांचा आठवडा लागू करण्यात यावा. ILO ठराव व कायद्यानुसार 8 तासाच्या कामाची अंमलबजावणी करण्यात यावी.

२८. जिल्हा परिषद लिपिक कर्मचाऱ्यांची चौथ्या वेतन आयोगापासून निर्माण झालेली वेतन त्रुटी दूर करण्यात यावी.

२९. राज्य सरकारच्या विविध विभागातील रिक्त पदांवर त्वरित भरती सुरू करण्यात यावी.

३०. पुणे मेट्रो रेल्वे कंत्राटी कामगारांना सेवेत कायम करण्यात यावे.

३१. ज्येष्ठ नागरिकांसाठी रेल्वेच्या तिकिटामध्ये बंद करण्यात आलेली सवलत पुन्हा सुरू करण्यात याव्यात.

३२. राज्य व केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी .

३३. महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ कर्मचाऱ्यांचा प्रलंबित वेतन करार त्वरित करण्यात यावा.

सहकार्याची अपेक्षा धन्यवाद !

आपले

ॲड अनिल ढुमणे
अध्यक्ष

किरण मिलगिर
महामंत्री

।। श्रम हीच आराधना।।

# भारतीय मजदूर संघ, महाराष्ट्र प्रदेश

**Bharatiya Mazdoor Sangh, Maharashtra Pradesh**

रजि नं. पी एन 2903 दि.4.4.97

कार्यालय : 25 इब्राहिम मॅन्शन, डॉ. आंबेडकर रोड, परेल, मुंबई 400 012 ✆ 022 - 24713283/24709558
: mahabms55@gmail.com

**अध्यक्ष : ॲड. अनिल ढुमणे**
9850095017

**सरचिटणीस : किरण मिलगीर**
9860475847

दिनांक – २६.०३.२०२६

प्रति
मा. नामदार श्री आकाशजी फुंडकर,
कामगार मंत्री महाराष्ट्र राज्य
मंत्रालय मुंबई 32.

विषय - महाराष्ट्रातील कामगारांच्या दीर्घ काळापासून प्रलंबित व दुर्लक्षित असलेले प्रश्न आणि मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेशाच्या वतीने १६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११.०० वा. राज्य कामगार आयुक्त, बांद्रा मुंबई कार्यालयावर कामगारांचा मोर्चा.

महोदय,

भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेशाच्या वतीने गुरुवार दिनांक १६ एप्रिल २०२६ रोजी राज्यातील कामगारांच्या विविध प्रश्नांकडे सरकारचा लक्ष वेधण्यासाठी कामगारांचा मोर्चा कामगार आयुक्त कार्यालय महाराष्ट्र शासन कामगार भवन बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स मुंबई या ठिकाणी आयोजित करण्यात आलेला आहे. याबाबत माननीय मुख्यमंत्री नामदार श्री देवेंद्रजी फडणवीस यांना पाठवलेल्या पत्राची प्रत सोबत आम्ही आपल्या माहितीसाठी जुळत आहोत त्याचबरोबर कामगारांचे मागणी पत्र ही आपल्या माहितीसाठी सादर करीत आहोत.

आपणास विनंती आहे की या पत्राची दखल घ्यावी हे प्रश्न सोडवण्यासाठी उचित कार्यवाही करावी तसेच १६ एप्रिल २०२६ रोजी आमच्या शिष्टमंडळाचे निवेदन स्वीकारण्यासाठी आणि चर्चा करण्यासाठी आम्हाला वेळ देण्यात यावी.

सहकार्याची अपेक्षा धन्यवाद !

आपले

ॲड अनिल ढुमणे
अध्यक्ष

किरण मिलगिर
महामंत्री

।। श्रम हीच आराधना।।

# भारतीय मजदूर संघ, महाराष्ट्र प्रदेश

## Bharatiya Mazdoor Sangh, Maharashtra Pradesh

रजि नं. पी एन 2903 दि.4.4.97

कार्यालय : 25 इब्राहिम मॅन्शन, डॉ. आंबेडकर रोड, परेल, मुंबई 400 012 © 022 - 24713283/24709558
: mahabms55@gmail.com

अध्यक्ष : ॲड. अनिल ढुमणे
9850095017

सरचिटणीस : किरण मिलगीर
9860475847


दिनांक – २६.०३.२०२६

प्रति
मा. कामगार आयुक्त,
महाराष्ट्र शासन ,
कामगार भवन BKC बांद्रा (पूर्व ) मुंबई 50.

विषय - महाराष्ट्रातील कामगारांच्या दीर्घ काळापासून प्रलंबित व दुर्लक्षित असलेले प्रश्न आणि मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेशाच्या वतीने १६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११.०० वा. कामगार आयुक्त, बांद्रा मुंबई कार्यालयावर कामगारांचा मोर्चा.

महोदय,

भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेशाच्या वतीने गुरुवार दिनांक १६ एप्रिल २०२६ रोजी राज्यातील कामगारांच्या विविध प्रश्नांकडे सरकारचा लक्ष वेधण्यासाठी कामगारांचा मोर्चा कामगार आयुक्त कार्यालय महाराष्ट्र शासन कामगार भवन बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स मुंबई या ठिकाणी सकाळी ११.०० आयोजित करण्यात आलेला आहे. याबाबत माननीय मुख्यमंत्री नामदार श्री देवेंद्रजी फडणवीस यांना पाठवलेल्या पत्राची प्रत सोबत आम्ही आपल्या माहितीसाठी जोडत आहोत त्याचबरोबर कामगारांचे मागणीपत्र ही आपल्या माहितीसाठी सादर करीत आहोत.

आपणास विनंती आहे की या पत्राची दखल घ्यावी. हे प्रश्न सोडवण्यासाठी उचित कार्यवाही करावी. तसेच १६ एप्रिल २०२६ रोजी आमच्या शिष्टमंडळाचे निवेदन स्वीकारण्यासाठी आणि चर्चा करण्यासाठी आम्हाला वेळ देण्यात यावी.

सहकार्याची अपेक्षा धन्यवाद !

आपले

ॲड अनिल ढुमणे
अध्यक्ष

किरण मिलगिर
महामंत्री

ESI

।। श्रम हीच आराधना ।।

# भारतीय मजदूर संघ, महाराष्ट्र प्रदेश

## Bharatiya Mazdoor Sangh, Maharashtra Pradesh

रजि नं. पी एन 2903 दि.4.4.97

कार्यालय : 25 इब्राहिम मॅन्शन, डॉ. आंबेडकर रोड, परेल, मुंबई 400 012 ✆ 022 - 24713283/24709558
: mahabms55@gmail.com

अध्यक्ष : ॲड. अनिल ढुमणे
9850095017

सरचिटणीस : किरण मिलगीर
9860475847

दिनांक – ०६.०४.२०२६

प्रति
मा. नामदार श्री देवेंद्रजी फडणवीस,
मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य
मंत्रालय मुंबई ३२.

मा. नामदार श्री आकाशजी फुंडकर,
कामगार मंत्री महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई ३२.

मा. नामदार श्री प्रकाशजी आबिटकर ,
सार्वजनिक आरोग्य मंत्री महाराष्ट्र राज्य,मंत्रालय मुंबई ३२.

विषय - १६ एप्रिल २०२६ च्या भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेश च्या वतीने आयोजित आक्रोश मोर्चा माध्यमातून महाराष्ट्रातील कामगार राज्य विमा योजन संबंधातील प्रलंबित मागण्या व प्रश्न..

संदर्भ – आमचे दिनांक १०.०९.२०२५ , दिनांक ०८.०२.२०२३ , दिनाक ०७.०१.२०२५ चे व अन्य विविध पत्र

महोदय ,
महाराष्ट्र राज्यातील कामगारांचे विविध प्रश्न गेल्या अनेक काळापासून प्रलंबित आहे. त्यात कामगार राज्य विमा योजनेशी संबंधित प्रश्न अत्यंत महत्वाचे आहे. गेली १० वर्ष याबाबत आम्ही पाठपुरावा करत असून याबाबत वेळोवेळी निवेदन देण्यात आली आहे

महाराष्ट्र राज्य हे औद्योगिक दृष्ट्या प्रगत राज्य आहे. देशातील कामगार राज्य विमा योजनेच्या ३.५ कोटी सदस्यांपैकी सुमारे ४९००००० सदस्य IP आणि सुमारे १९२००००० लाभधारक हे महाराष्ट्र राज्यातील आहेत. सदर योजनेला देशभरातून जमा होणाऱ्या एकूण महसूला पैकी सुमारे १७ टक्के महसूल हा महाराष्ट्र राज्यातून जमा होतो.

कामगार राज्य विमा महामंडळाने गेल्या वर्षी देशभरात सरासरी ३६०० प्रति IP रक्कम खर्च केलेली होती, मात्र महाराष्ट्रात प्रति IP केवळ १५००-१६०० रुपये रक्कम खर्च झालेली आहे ही अत्यंत खेदाची बाब आहे. महाराष्ट्रातील कामगार सर्वाधिक वर्गणी भरत असतांना देखील ESI च्या चांगल्या लाभांपासून वंचित आहे. कामगारांमध्ये सेवा मिळत नसल्याबाबत अनेक

तक्रारी आहेत. सेवा मिळत नसल्याने आमची वर्गणी बंद करा अशी मागणी केली जात आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर भारतीय मजदूर संघ महाराष्ट्रच्या वतीने महाराष्ट्रातील कामगारांच्या कामगार राज्य विमा योजनेच्या संबंधित पुढील मागण्या आपणास सादर करीत आहोत –

१. महाराष्ट्र राज्य कामगार विमा योजनेची रिजनल कमिटीची पुनर्गठण त्वरित करण्यात यावे. त्यावर भारतीय मजदूर संघाचे प्रतिनिधी घेण्यात यावे. गेल्या १५ वर्षांपासून ह्या समितीचे गठन करण्यात आलेले नाही.

२. कामगार राज्य विमा योजनेच्या अंतर्गत रुग्णालयात असणाऱ्या रुग्णालय सल्लागार समितीची स्थापना त्वरित करण्यात यावी. त्यावर भारतीय मजदूर संघाचे प्रतिनिधी घेण्यात यावे.

३. महाराष्ट्रातील कामगार राज्य विमा योजनेचे सर्व रुग्णालय सक्रिय करण्यात यावीत. मंजूर बेड आणि उपलब्ध बेड यात खूप तफावत आहे. सर्व मंजूर खाटा उपलब्ध करून देण्यात याव्यात.

४. ठाणे , उल्हासनगर ही रुग्णालय बंद आहेत ती पुन्हा सुरू करण्यात यावी. वरळी रुग्णालय बंद आहे तेही सुरू करण्यात यावे. मुलुंड रुग्णालय अंशतः सुरू आहे ते पूर्ण क्षमतेने सुरू करण्यात यावे.

५. कामगारांना विविध सेवांसाठी खाजगी रुग्णालयामध्ये पाठवण्याऐवजी कामगार राज्य विमा योजनेची रुग्णालय अत्याधुनिक करण्यात यावी आणि खाजगी रुग्णालयांवर होणारा वारेमाप खर्च हा टाळण्यात यावा. .

६. रायगड जिल्ह्यात खोपोली, पेन, खालापूर, उरण, पातळगंगा, रोहा, महाड, भागाड या ठिकाणी कामगार राज्य विमा योजनेची दवाखाने सुरू करण्यात यावे. पेण येथे कामगार राज्य विमा योजना रुग्णालय सुरू करण्यात आले.

७. रत्नागिरी जिल्ह्यात लोटे परशुराम या ठिकाणी कामगार राज्य विमा योजनेचे दवाखाने सुरू करण्यात यावा. तसेच रत्नागिरी येथे रुग्णालय सुरू करण्यात यावे.

८. सिंधुदुर्ग जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर सदस्य आहेत मात्र दवाखाना अथवा रुग्णालय कुठलीही व्यवस्था नाही. तरी कणकवली या ठिकाणी दवाखाना सुरू करण्यात यावा .

९. सातारा जिल्ह्यात सातारा या ठिकाणी रुग्णालय सुरू करण्यात यावे. तसेच शिरवळ आणि कराड या ठिकाणी दवाखाना सुरू करण्यात यावा.

१० पालघर जिल्ह्यात वसई, बोईसर, तलासरी, वाडा या ठिकाणी कामगार राज्य विमा योजनेचे दवाखाने सुरू करण्यात यावे. पालघर येथे कामगार राज्य विमा रुग्णालय सुरू करण्यात यावे.

११ पुणे जिल्ह्यातील रांजणगाव येथे नव्याने रुग्णालय सुरू करण्यात यावे. तसेच बिबेवाडी रुग्णालय पूर्ण क्षमतेने चालवण्यात यावे. पिरंगुट, कुरकुंभ, चाकण, तळेगाव या ठिकाणी कामगार राज्य विमा योजनेचे दवाखाने सुरू करण्यात यावे.

१२ नाशिक जिल्ह्यात सिन्नर, दिंडोरी, गोंदे, मालेगाव आदी तालुक्यात कामगार राज्य विमा योजनेचे दवाखाने सुरू करण्यात यावे. नाशिक जिल्ह्यातील रुग्णालय खूप जुने झाले असून त्याची पुनर्बांधणी आणि पुनर्रचना करण्यात यावी.

१३ संभाजीनगर जिल्ह्यात पैठण रोडला नवीन दवाखाना सुरू करण्यात यावा .जालना येथे मोठ्या प्रमाणावर औद्योगिक क्षेत्र निर्माण झालेले असून त्या ठिकाणी रुग्णालय सुरू करण्यात यावे.

१४ अहिल्यानगर येथे जुनी एमआयडीसी आहे. तसेच अन्यही तालुक्यात मोठ्या प्रमाणावर औद्योगिक वाढ झालेली आहे. तेथे रुग्णालय सुरू करण्यात यावे. शिर्डी येथे दवाखाना सुरू करण्यात यावा.

१५ विदर्भामधील कामगार राज्य विमा योजनारुग्णालय दवाखान्याबाबत विदर्भातील स्थिती दयनीय आहे. नागपूर चंद्रपूर वगळता ई एस आय सी चे रुग्णालय नाही . तेथेही पुरेशा व्यवस्था नाही.

१६ नागपूर येथे बुटीबोरी ला नवीन रुग्णालयाचे काम संथ गतीने सुरू आहे .नागपूर मध्ये मौदा, कळमेश्वर, हिंगणा, उमरेड, काटोल येथे किमान ई एस आय सी दवाखाना आवश्यक आहे. कर्मचाऱ्यांना फार दूरवरून येणे जाणे करावे लागते .

१७ अमरावती, गोंदिया- भंडारा, अकोला, येथे रुग्णालये सुरु करण्यात यावी. अन्य ठिकाणी दवाखाने सुरु करण्यात यावे.

१८ कामगार राज्य विमा योजनेची जिल्ह्यातील दवाखाने व रुग्णालय आदि माहिती मराठी , हिंदी मध्ये पत्रक प्रत्येक सदस्याला देण्यात यावी. त्यात जिल्ह्यातील दवाखाने, त्यांच्या संबंधित डॉक्टरांची यादी, विमाधारक कामगारांचे हक्क व मिळणाऱ्या सेवा , कार्यपद्धती याची स्पष्ट माहिती इन्शुरन्स पॉलिसी प्रमाणे देण्यात यावी.

१९ कामगार राज्य विमा योजनेच्या बाबत जागृती निर्माण करण्यासाठी सर्व जिल्ह्यात कामगार राज्य विमा योजनेबाबत कामगार जागृती मेळावे कॅम्प घेण्यात यावे. त्यात भारतीय मजदूर संघाला सहभागी करून घेण्यात यावे.

२० महाराष्ट्रातील विनाअनुदानित शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी तसेच खाजगी दवाखाने व रुग्णालय कामगार यांना कामगार राज्य विमा योजना च्या कक्षेत आणण्यात यावे.

२१ प्रत्येक जिल्ह्यात कामगार राज्य विमा रुग्णालय सुरू करण्यात येईल अशी घोषणा माननीय कामगार मंत्री श्री सुरेश भाऊ खाडे यांनी केलेली होती. त्याची अंमलबजावणी करण्यात यावी.

तरी आपणास नम्र विनंती की या विषयावर स्वतंत्र त्वरित बैठक आयोजित करण्यात यावी. बैठकीस शासनाचे संबंधित सर्व अधिकारी उपस्थित असावे.

सहकार्याची अपेक्षा, धन्यवाद !

आपले

( ॲड अनिल ढुमणे ) ( किरण मिलगीर )

अध्यक्ष जनरल सेक्रेटरी

मा. रिजनल कमिशनर , कामगार राज्य विमा मंडळ , पंचदीप भवन, लोवर परेल , मुंबई .

मा. आयुक्त , महाराष्ट्र राज्य कामगार राज्य विमा योजना , पंचदीप भवन, लोवर परेल , मुंबई .

|| श्रम ही आराधना ||

# बांधकाम कामगार महासंघ

महाराष्ट्र प्रदेश

संलग्न भारतीय मजदूर संघ

(नोंदणी क्रमांक - 3930 / दिनांक- 17/07/2008)

नोंदणी कार्यालय : उमाशंकर अपार्टमेंट, दैवज्ञ बोर्डिंग जवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर.

संपर्क कार्यालय : २५, इब्राहीम मेंशन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, परेल, मुंबई-१२.

संदर्भ क्रमांक : दिनांक : 30 मार्च 2026

**प्रति**

**माननीय नामदार श्री देवेंद्रजी फडणवीस,**

**मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य,**

**मंत्रालय, मुंबई 32.**

**विषय : महाराष्ट्र राज्यातील बांधकाम कामगारांच्या विविध प्रलंबित आणि दुर्लक्षित मागण्यांसाठी 16 एप्रिल 2026 रोजी मा. कामगार आयुक्त कार्यालय बांद्रा या ठिकाणी मोर्चा..**

**महोदय,**

महाराष्ट्र राज्यात बांधकाम कामगारांच्या साठी 'महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ' कार्यरत आहे. या मंडळातील कामकाज आणि राबवल्या जाणाऱ्या योजनांमध्ये बोकाळलेला प्रचंड भ्रष्टाचार आणि निधीचा दुरुपयोग याबाबत कामगारांमध्ये प्रचंड आक्रोश आहे. प्रत्यक्ष बांधकाम कामगार नसलेले अनेक नागरिक त्यामध्ये सदस्य असून त्यांच्या माध्यमातून मंडळाच्या निधीचा मोठ्या प्रमाणावर दुरुपयोग केला जात आहे. याबाबत विविध निवेदने, मोर्चा, आंदोलने करूनही त्याबाबत सरकारने बैठकही घेतलेली नाही. आणि त्यात कुठलाही बदल केलेले नाही. महाराष्ट्र राज्यातील बांधकाम कामगारांच्या मागण्या आपणास पुढील प्रमाणे सादर करीत आहोत -

**बांधकाम कामगारांच्या मागण्या**

1) 'महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळा'ची मुदत 2021 ला संपलेली असल्याने मंडळाचे त्वरित पुनर्गठण त्वरित करा.

2)महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळामार्फत दिले जाणारे वस्तू रुपी लाभ त्यातील होणारा प्रचंड भ्रष्टाचार आणि निधीचा दुरुपयोग लक्षात घेऊन वस्तु रूपी त्वरित बंद करा.

3) महाराष्ट्र शासनाच्या 9 सप्टेंबर 2025 च्या निर्णयानुसार स्थापन करण्यात आलेल्या सहनियंत्रण समिति मार्फत होणारी बोगस नोंदणी लक्षात घेऊन या सहनियंत्रण समित्या ताबडतोब रद्द करा आणि तालुकास्तरावर नोंदणी सुरू ठेवा.

4) 'महाराष्ट्र इमारत व इतर कामगार बांधकाम मंडळा' मार्फत राबवण्यात येणाऱ्या आरोग्य योजनेतील प्रचंड भ्रष्टाचार, तक्रारी आणि मयत बांधकाम कामगारांचीही तपासणी यामुळे वादात सापडलेली ही योजना त्वरित बंद करा आणि पर्यायी योजना सुरू करण्याबाबत महासंघा बरोबर चर्चा करा.

..2

Scanned with OKEN Scanner

5) 'महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार मंडळा'त नोंदीत कामगारांना नूतनीकरण आणि नवीन नोंदणीसाठी आवश्यक असणारे 90 दिवस कामाचे प्रमाणपत्र देण्याबाबत व्यवस्था निर्माण करा व सध्याच्या व्यवस्थेतील त्रुटी दूर करा.

6) 'महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळा'मार्फत राबवण्यात येणारी कौशल्य विकास योजना प्रत्यक्षात फसवणूक असल्याने त्याची चौकशी करा आणि कामगारांना कौशल्य विकास करण्यासाठी जिल्हास्तरावर कौशल्य विकास केंद्र स्थापन करा.

7) 'महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळा'मार्फत सदस्य आणि त्यांच्या पत्नीला दिली जाणारी प्रसुती लाभाची बंद केलेली योजना पुन्हा सुरू करा. दरम्यानच्या काळात प्रस्तुत झालेल्या महिला सदस्यांना किंवा पत्नीला त्यांचे लाभ द्या.

8) 'महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळा'मार्फत राबवल्या जाणाऱ्या योजनांच्या साठी महाराष्ट्र 'लोकसेवा हक्क अधिनियम 2015' लागू करा आणि सर्व योजनांची अंमलबजावणी वेळेत करा.

9) 'महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळा'च्या कामकाजासाठी मंडळाचा कायमस्वरूपी कर्मचारी वर्ग नियुक्त करा.

10) सन 2015 ते 2020 या काळात ऑफलाईन अर्ज केलेल्या ज्या सदस्यांना लाभ मिळालेले नाही त्यांना लाभ देऊन त्यांचे अर्ज त्वरित निकाली काढा.

आपणास विनंती आहे की या मागणी पत्रावर आपल्या उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात यावी आणि या बैठकीस बांधकाम कामगार महासंघाच्या प्रतिनिधी निमंत्रित करण्यात यावे आणि सदर प्रश्न सोडवण्यात यावे.अन्यथा दिनांक 16 एप्रिल 2026 रोजी कामगार आयुक्त कार्यालयावर मोर्चा काढण्यात येईल. या मोर्चात महाराष्ट्र बांधकाम कामगार महासंघाचे हजारो कामगार त्यात सहभागी होतील याची नोंद घ्यावी

सहकार्याची अपेक्षा धन्यवाद !

आपले

हरी चव्हाण
अध्यक्ष
9372275309

रविंद्र माने
जनरल सेक्रेट
8975589700

प्रत महितीसाठी

1) मा. कामगार मंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई -400032.
2) मा. कामगार आयुक्त, मुंबई. बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा, मुंबई -40005.
3) मा. अध्यक्ष, भारतीय मजदूर संघ, महाराष्ट्र प्रदेश, मुंबई परळ- 400012.

Scanned with OKEN Scanner

।। श्रम हीच आराधना ।।

# महाराष्ट्र राज्य घरेलू कामगार महासंघ

नोंदणी क्र. : ए. एल. सी. /कार्यासान/१७/१०२२९

**संलग्न : भारतीय मजदूर संघ**

२५, इब्राहीम मेन्शन, डॉ. आंबेडकर रोड, परळ, मुंबई-४०० ०१२.

सौ. शर्मिला पाटील
अध्यक्ष
९९६९०६६३९८

सौ. संजना वाडकर
सरचिटणीस
९४२०५२५६६८

दि.     /04/2026.

प्रति,

1. मा. ना. श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब,
   मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.
2. मा. ना. श्री. आकाशजी फुंडकर,
   कामगार मंत्री, महाराष्ट्र राज्य.

विषय: **महाराष्ट्र राज्यातील घरेलू कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत आणि विविध कल्याणकारी मागण्यांबाबत.**

संदर्भ:- **गुरुवार दिनांक १६ एप्रिल २०२६ रोजी कामगार आयुक्त कार्यालय, वांद्रे, मुंबई येथे आयोजित 'कामगारांचा आक्रोश मोर्चा'.**

महोदय,

महाराष्ट्र प्रदेश घरेलू कामगार संघातर्फे आम्ही आपणास हे निवेदन सादर करत आहोत. गेल्या अनेक वर्षांपासून राज्यातील घरेलू कामगारांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. वारंवार निवेदने देऊनही सरकारकडून त्यावर कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे कामगारांमध्ये तीव्र असंतोष असून, या प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी आणि जाब विचारण्यासाठी **गुरुवार दिनांक १६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता कामगार आयुक्त कार्यालय, वांद्रे (पूर्व), मुंबई येथे 'कामगारांचा आक्रोश मोर्चा'** काढण्यात येणार आहे.
आमच्या खालील न्याय्य मागण्यांवर त्वरित विचार व्हावा ही विनंती:

**आमच्या प्रमुख मागण्या:**

१. घरेलू कामगार कल्याण मंडळाचे पुनर्गठन: २०१४ पासून प्रलंबित असलेले 'महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळ' त्वरित पुनर्गठीत करावे. मंडळाला पुरेसा निधी आणि प्रशासकीय अधिकार देऊन, विकेंद्रित व्यवस्थेनुसार जिल्हा स्तरापासून तालुका, नगर परिषद व ग्रामपंचायत स्तरापर्यंत त्याची कार्यक्षमता वाढवावी.

२. सर्वसमावेशक व डिजिटल नोंदणी: ग्रामीण व शहरी सर्व घरेलू कामगारांची नोंदणी वयोमर्यादा वाढवून ती ६५ वर्षे करण्यात यावी. तसेच कामगारांसाठी सोपी, मोफत व सार्वत्रिक नोंदणी व्यवस्था करावी. मोबाईल ॲप, सेतू केंद्र, जनसेवा केंद्र व इतर डिजिटल माध्यमांद्वारे घरेलू कामगारांना नोंदणीची सुविधा उपलब्ध करून द्यावी.

३. कल्याणकारी योजना व भांडी वाटप: महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळाच्या सर्व बंद पडलेल्या योजना पुन्हा तातडीने सुरू कराव्यात. मंडळाच्या माध्यमातून अनेक जिल्ह्यांत प्रलंबित असलेले भांडी वाटप त्वरित पूर्ण करावे.

४. सामाजिक सुरक्षा: आरोग्य, शिक्षण, विमा, मातृत्व लाभ व वृद्धापकाळ पेन्शन यांसारख्या सर्वसमावेशक सामाजिक सुरक्षा योजना घरेलू कामगारांना लागू करण्यात याव्यात. तसेच मोफत वार्षिक आरोग्य तपासणी योजना सुरू करावी.

५. कायदेशीर संरक्षण व किमान वेतन: घरेलू कामगारांना शोषणापासून संरक्षण देण्यासाठी स्पष्ट कायदेशीर तरतुदी करण्यात याव्यात. त्यांना किमान वेतन, ठराविक कामाचे तास, सुट्ट्या, बोनस आणि सन्मानजनक वागणूक याची हमी दिली जावी.

६. सन्मानधन वाढ: मंडळाच्या वतीने दिले जाणारे सन्मानधन वाढवून २५ हजार रुपये करावे.

७. घरकुल योजना: घरेलू कामगारांना घरकुल योजना लागू करावी.

आम्ही आशा करतो की, घरेलू कामगारांच्या या जिव्हाळ्याच्या प्रश्नांची शासन गंभीर दखल घेईल. अन्यथा, आपल्या हक्कासाठी १६ एप्रिलच्या आक्रोश मोर्चाच्या माध्यमातून कामगार अधिक तीव्र लढा उभारतील.

धन्यवाद !

आपले नम्र,

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **शर्मिलाताई पाटील**<br>**अध्यक्ष** | **शोभाताई आंबरकर**<br>**कार्याध्यक्ष** | **सजनाताइ बाडकर**<br>**महामंत्री** | **मनिषाताई ढुमणे**<br>**संघटन मंत्री** | **बेबीनंदाताई कांबळे**<br>**कोषाध्यक्ष** |

प्रत - मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य.

|| श्रम ही आराधना ||

राष्ट्राचे औद्योगिकरण | उद्योगाचे श्रमिकीकरण | श्रमिकांचे राष्ट्रीयकरण

# महाराष्ट्र अंगणवाडी कर्मचारी संघ

(संलग्न भारतीय मजदूर संघ)

रजि. नं.- पी.एन.२९८८

• प्रदेश कार्यालय - भा. म. संघ, महाराष्ट्र प्रदेश, २५ ईब्राहिम मॅन्शन, बाबासाहेब आंबेडकर मार्ग, परेल (इ.) मुंबई-१२.

• संपर्क कार्यालय - फ्लॅट नं. ५/६, राजवाडा एन.एक्स., २२५, सोमवार पेठ, नगर वाचनालय समोर, सातारा-४१५ ००२.

संदर्भ क्रमांक :

दिनांक : 29.03.2026

प्रति,

**मा. नामदार श्रीमती आदिती तटकरे**

महिला व बालविकास मंत्री महाराष्ट्र राज्य,

मंत्रालय,

मुंबई = 400 032.

**विषय : - अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्या विविध मागण्यांबाबत.**

महोदय,

अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्या विविध प्रश्नांबाबत आम्ही अनेक वेळा केंद्र तसेच राज्य सरकार बरोबर चर्चा केलेली आहे तसेच वेळोवेळी निवेदनेही दिलेली आहेत. परंतु केंद्र किंवा राज्य सरकारने आमच्या मागण्यांबाबत आजपर्यंत कोणतीही ठोस कार्यवाही केलेली नाही. यामुळे आता रस्त्यावर उतरून संघर्ष केल्याशिवाय आपल्याला न्याय मिळणार नाही अशी सर्व अंगणवाडी कर्मचाऱ्यांची भावना तयार झालेली आहे.

अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्या विविध मागण्यांबाबत आपणास अनेकवेळा निवेदन दिलेले आहेत. यातील प्रमुख मागण्या खालीलप्रमाणे आहेत.

1] अंगणवाडी कर्मचाऱ्यांना कर्मचारी म्हणून घोषित करा .

2] प्राथमिक शिक्षकांप्रमाणे वेतनश्रेणी आणि इतर सुविधा लागू करा.

3] अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना भविष्य निर्वाह निधी योजना लागू करावी.

4] अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांना पेन्शन योजना लागू करावी.

5] अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांना वैद्यकीय सुविधा देण्यात याव्यात.

6] अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांना बोनस देण्यात यावा.

7] अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांची रीक्त पदे ताबडतोब भरण्यात यावीत

8] अंगणवाडी सेविकांना पर्यवेक्षक (सुपरवायझर) म्हणुन पदोन्नती देण्यात यावी. यासाठी वयाची अट शिथिल करण्यात यावी. अंगणवाडी मदतनीसांना सेविका म्हणुन पदोन्नती देण्यात यावी

9] अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांना प्राथमिक शाळेप्रमाणे रजा आणि सुट्ट्या मिळाव्यात. आजारीपणाची रजा मिळावी.

10] अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांना प्रकल्पाबाहेरील कामाची सक्ती करू नये. विविध सरकारी सर्व्हे, कृषी मोजणी, लाडकी बहिण पडताळणी, जन गणना आदी कामांचा बोजा अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्यावर टाकू नये.

11] अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांनी यापूर्वी केलेल्या सर्व कामांचे पैसे ताबडतोब देण्यात यावेत.

कृपया आपण अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांच्या वरील प्रश्नांबाबत जातीने लक्ष घालावे. याबाबतीत आपल्याशी सविस्तर चर्चा करण्यास संघटना तयार आहे. कृपया आपल्या भेटीची तारीख आणि वेळ कळवावी ही नम्र विनंती.

अन्यथा भारतीय मजदूर संघ, महाराष्ट्र प्रदेश यांच्या वतीने मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य कार्यालय, वांद्रा मुंबई येथे वरील प्रलंबित मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी १६ एप्रिल २०२६ रोजी अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचा भव्य *'**कामगार जन आक्रोश मोर्चा**'* आयोजित करण्यात येईल.

आपल्या विश्वासु

| वनिता सावंत | अनीता चव्हाण | स्मिता पानसे | नीता सूर्यवंशी |
|---|---|---|---|
| अ.भा. उपाध्यक्ष | सरचिटणीस | अध्यक्ष | संघटन मंत्री |

प्रत : - माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी

**मा. नामदार श्रीमती मेघना ताई बोर्डीकर**

ऊर्जा, महिला व बालविकास मंत्री

महाराष्ट्र राज्य

**मा. आयुक्त**

महिला व बालविकास खाते

रायगड भवन, बेलापूर ,

नवी मुंबई 400 614

महाराष्ट्र राज्य.

**अध्यक्ष,**

भारतीय मजदूर संघ,महाराष्ट्र प्रदेश,

25, इब्राहीम मॅशन, डॉ, बाबासाहेब आंबेडकर रोड,

परळ, मुंबई -400012.

# आशा व गटप्रवर्तक सेविका संघ

**सलंग्न - भारतीय मजदूर संघ** **महाराष्ट्र प्रदेश**

**नोंदणीकृत पत्ता :- ७, विनोद अपार्टमेंट ,एन. डी. पटेल रोड , टेलीफोन एक्सचेंज जवळ , नाशिक -१**
**कार्यालयीन पत्ता :- उमाशंकर सहनिवास , १३४८ , बी वॉर्ड , दैवज्ञ बोर्डिंग जवळ , मंगळवार पेठ , कोल्हापूर – ४१६०१२**

**जावक क्रमांक :- ०३/२०२६** **दि. १६ / ०४ / २०२६**

प्रति,
**मा. मुख्यमंत्रीसो ,**
**महाराष्ट्र सरकार,**
महाराष्ट्र राज्य,मंत्रालय,
मुंबई-३२

**एवम**

**मा. नामदार श्री. प्रकाशजी आबिटकरसो ,**
सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री ,
महाराष्ट्र राज्य,मंत्रालय,
मुंबई-३२

**विषय :- कामगार आक्रोश मोर्चा मधील आशा व गटप्रवर्तकाच्या विविध प्रश्नासंदर्भातबाबत...**

महोदय,

आपल्या महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाच्या राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हापरिषद , महानगरपालिका व नगरपालिकाकडे आशा व कार्यरत आहेत. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार आशा कार्यक्रमातंर्गत कार्यरत आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक हे कामावर आधारित मोबदला या तत्वावर नियुक्त करण्यात आलेल्या आहेत. आशांना एनएचएममधील विविध कार्यक्रमातंर्गत विविध कामावर आधारित मोबदला देण्यात येतो . आशा स्वयंसेविका ह्या त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व भागात जाऊन आरोग्य विषयक जनजागृती व समुपदेशन करीत असतात. त्याच्या प्रलंबित प्रश्नाकडे आम्ही **गुरुवार दि. १६ एप्रिल २०२६ रोजी आशा व गटप्रवर्तकाच्या विविध प्रश्न आपले लक्ष वेधण्यासाठी कामगार आक्रोश मोर्चा** पुढीलप्रमाणे प्रश्न मांडत आहोत –

१) आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तकां ह्यांना सरकारी सेवेत सामावून घेण्यात यावे व त्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा.

२) आशा व गटप्रवर्तक ह्यांना देखील त्यांच्या गरोदरपणात व अपत्य जन्मास आले नंतर आपल्या अपत्याची सुश्रुषा करणेसाठी प्रसूती रजा मिळावी व त्यांना त्याकाळात रु. १००००/- इतके ठोक मानधन मिळावे.

३) शासनाची मातृवंदना योजनेचा सन २०२२ पासून पर्यंत चे प्रलंबित लाभ आशा स्वयंसेविका मिळाले नाहीत ते मिळावेत.

४) आशा व गटप्रवर्तक ह्यांना ऑनलाईन कामाबाबत आग्रह धरला जातो , त्यांना 5G एनेबल टॅब देण्यात यावेत व त्यासाठी लागणारा इंटरनेट डेटा देण्यात यावा तसेच याबाबत कुठलेही प्रशिक्षण प्रथमतः दिले जात नाही. प्रशिक्षणाची सोय केलेस कामात अचूकता व गती आणण्यास आशा व गटप्रवर्तकांना सोयीचे होईल.

५) आशा व गटप्रवर्तकांना आपल्या भागात फिरण्यासाठी घर ते भाग व आरोग्य केंद्रात जाणेसाठी आशा आपल्या दुचाकीवरून प्रवास करतात तसेच ग्रामीण भागातील आशा व गटप्रवर्तकांना जिल्ह्यातर्गत कार्यालयीन कामकाजासाठी प्रवास करावा लागतो. त्यासाठी प्रवास भत्ता म्हणून शासनामार्फत रु. ५००/- इतका देण्यात यावा.

६) शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार एनसीडी कार्यक्रमांतर्गत ३० वर्षावरील व्यक्तीचे सर्वेक्षणाचे कामकाज आशा स्वयंसेविका यांचे मार्फत करणेत येते. त्याकरीता सी-बॅक फॉर्म भरणेत येतो व प्रति व्यक्ती रु.१०/- व एनसीडी अंतर्गत आढळून आलेल्या रुग्णास उपचार करण्यास प्रवृत्त करणे रु.५०/- इतके मानधन मंजूर

आहे. परंतु सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये प्राप्त मार्गदर्शक सूचनेमध्ये केवळ ग्रामीण भागातील आशा स्वयंसेविका यांना मंजुर करणेत आलेले आहेत मात्र शहरी भागातील आशा स्वयंसेविकांना नाही. म्हणजेच एकच काम करणार्या आशा सेविकां मध्ये भेदभाव करण्यात आला आहे. तरी नगरपालिका व महानगरपालिका मधील आशा सेविकांना देखील समाविष्ट करण्यात यावे व त्याचे देय मानधन अदा करण्यात यावे.

७) आर सी एच कार्यक्रमातर्गत आशा स्वयंसेविकांना लागू असलेल्या कुटुंब नियोजन कार्यक्रमातील विवाहानंतर नवदाम्पत्यास त्यांच्या दोन अपत्याच्या जन्मामध्ये तीन वर्षाचे अंतर ठेवण्यासाठी प्रवृत्त केल्यास मिळणारे मानधन रु ५००/- सध्या बंद करणेत आले आहे. तरी ते पुनच्यः चालू करणेत यावे.

८) मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचे लाभार्थ्याचे अर्ज भरण्यासाठी आशा सेविकांना प्रशासकीय दबाव वापरून आशा सेविकाकडून भरून घेतले. पण त्यासाठीचे कोणतेही मानधन आपण अद्याप अदा केलेले नाही. आशा सेविका ह्या कामावर आधारित मानधन घेऊन काम करत असल्याने त्यांना ह्या कामाचाही मोबदला देण्यात यावा.

९) आपल्या जीवनात प्रत्येकाचे स्वतःचे एक आपले घर असावे असे स्वप्न असते म्हणून आशा व गटप्रवर्तकांना जागा खरेदी , घरबांधणीशासनाने आपल्या विविध योजनातून लाभ मिळवून द्यावा व त्यांच्या अत्यावश्यक गरजासाठी राष्ट्रीयकृत बँकेतून अर्थ सहाय्य मिळावे यासाठी शासनाने विशेष प्रयत्न करावे.

१०) आशा व गटप्रवर्तकांना दरवर्षी दिवाळी सणास भाऊबीज म्हणून रु. ५०००/- देण्यात येऊन त्याची दिवाळी गोड करावी. आशा व गटप्रवर्तकांचे प्रत्येक महिन्याचे मानधन त्या महिन्यातच जमा होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात यावेत . केंद्र शासनाचे मिळणारे मानधन राज्य शासनाच्या मांनधनाबरोबर राज्य शासनाने आगाऊ अदा करावे व केंद्र शासनाचे मानधन आल्यानंतर ते वर्ग करून घ्यावे.

११) प्रति वर्षी आशा सेविकां व गटप्रवर्तकांना उत्कृष्ट आशा सेविका व गटप्रवर्तक म्हणून सन्मानीत करण्यात येते. पण शासनाने त्यासाठी पुरस्कारात देण्यात येणाऱ्या बक्षीस रक्कमेत वाढ करायची सोडून ती आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे परिपत्रक क्र. राआअ / आशा . प्रशिक्षण वितरण / ६६८५०-६७०२० /२४ दि. १२ डिसेंबर २०२४ नुसार ते कमी करण्यात आले आहे तरी पूर्वी देण्यात येणाऱ्या रक्कमेत वाढ करून सदर बक्षीसे
देण्यात यावीत .

१२) आशा व गटप्रवर्तकांना त्याच्या निवृत्तीनंतर ग्रॅज्युटी म्हणून रु. १०,००,०००/- इतकी रक्कम व निवृत्तीवेतन म्हणून वार्षिक रु. ५०,००० /- देण्यात यावे.

१३) भारत सरकारकडून चालू असणाऱ्या महिला आरोग्य समितीचे पुनःच्य एकदा गठन करण्यात यावे व त्याच्या मानधनात वाढ करण्यात यावी.

आपणास नम्र विनंती आहे की, वरील मागण्यांबाबत तातडीने निर्णय होऊन न्याय मिळावा. लोभ आहेच तो वृद्धीवंत व्हावा.
धन्यवाद !

कळावे.

आपली भगीनिवंत ,

सौ, ज्योती तावरे
अखिल भारतीय सचिव ,
अखिल भारतीय आशा कर्मचारी महासंघ
महिला प्रतिनिधी – भारतीय मजदूर संघ ,
महाराष्ट्र प्रदेश

प्रत सविनय सादर :

१) मा. प्रदेशाध्यक्ष , भारतीय मजदूर संघ , महाराष्ट्र प्रदेश

॥ श्रम ही आराधना ॥

# महाराष्ट्र वीज कामगार महासंघ

* प्रदेश कार्यालय *

(संलग्न भारतीय मजदूर संघ)

नोंदणी क्रमांक : पी.एन. ८३३

४, मार्शल आर्केड, राका कॉलनी, शरणपूर रोड, नाशिक-४२२ ०२२. दूरभाष : २५७९१६७, फॅक्स : (०२५३) २५७९१६७

* महामंत्री कार्यालय *

म. वी. कामगार महासंघ, मालखरे आर्केड, मराठवाडा सांस्कृतिक मंडळ रोड, खडकेश्वर, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००१. ई-मेल : arunpiwal777@gmail.com

| विठ्ठल भालेराव | संजय दंडारे | सचिन पाटील | अरुण पिवळ |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | कार्याध्यक्ष | संघटन मंत्री | महामंत्री |
| मो. ९१५८२५५५९९ | मो. ८५५४९८८८९० | मो. ९६०४९२५८६५ | मो. ९४२२९६६१०७ |


जा.क्र. महामंत्री/म.वी. का. महासंघ/खाजगीकरण/प्रलंबित मागण्या/भा.म.स.आक्रोश मोर्चा/९९ दिनांक. ३०/०३/२०२६

**प्रति,**

**मा. श्री. देवेंद्र फडणवीस**

**मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री**

**महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंई**

**विषय : भारतीय मजदूर संघ विदर्भ प्रदेश व महाराष्ट्र प्रदेश दि. ८ व १६ एप्रिल श्रमिक आक्रोश रॅलीतील महाराष्ट्र वीज कामगार महासंघाच्या प्रलंबित मुख्य मागण्या**

**संदर्भ :-** १) जा.क्र. महामंत्री/म.वी. का. महासंघ / खाजगीकरण / समांतर परवाना धोरण/२९ दिनांक. ०७/०७/२०२५ चे पत्र

महोदय,

सप्रेम नमस्कार, आपल्या सक्षम नेतृत्वात महाराष्ट्र राज्य दिवसेंदिवस सर्व क्षेत्रात प्रगती करत असून अनेक चांगले निर्णय या राज्याच्या उन्नतीसाठी आपण घेत आहात तसेच ऊर्जा क्षेत्राच्या बळकटीसाठी सुद्धा आपण विविध योजना राबवत आहात त्यात प्रधानमंत्री सूर्यघर योजना, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, आर डी एस एस निश्चितच याच आम्ही स्वागत करतो, तसेच आपल्या नेतृत्वात महावितरण, महापारेषण, महानिर्मिती या तिन्ही कंपन्या विज क्षेत्रातील विविध पारितोषिक घेऊन विविध मानांकने मिळवत आहे. त्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. आपली महावितरण कंपनी ही भारतात क्रमांक एकची व आशिया खंडातील क्रमांक दोन ची सर्वात मोठी वीज वितरण कंपनी आहे. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासामध्ये वीज उद्योगातील या तिन्ही कंपन्यांचा मोलाचा वाटा आहे.

असे असताना दिनांक २३ व २५ जून २०२५ रोजी वर्तमानपत्रांमध्ये महावितरणच्या कार्यक्षेत्रात काही खाजगी कंपन्यांचे समांतर विज परवाना अर्ज संदर्भात एम. इ. आर. सी. ने पब्लिक नोटीस / जाहिरात प्रसिद्ध केली आहे.

वर्तमान पत्रातील पब्लिक नोटीस व जाहिरातीतून असे निदर्शनास येत आहे की, महाराष्ट्रातील प्रमुख आणि ज्यांचा वीज बिल वसुलीत अव्वल क्रमांक आहे अशी शहरे टोरंट पॉवर, अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड आणि टाटा पॉवर कंपनीने समांतर विद्युत वितरण करण्याचे अर्ज नियामक आयोगाकडे केले असून त्या बाबतची अंतिम सुनावणी नियामक आयोगाने निश्चित केल्याची जाहिरात वर्तमान पत्रात प्रसिद्ध झाली आहे.

महोदय, वर्ष २०२२ व २३ वीज वितरणाच्या समांतर परवाना करता महावितरण कार्यक्षेत्रात वर उल्लेखित टोरेंट पॉवर व अदानी इलेक्ट्रिसिटी या कंपन्यांनी एम. इ. आर. सी. कडे परवाना अर्ज सादर करून पब्लिक नोटीस जारी केली होती. त्यावेळी वीज क्षेत्रातील सर्व संघटनांच्या कृती समितीने संपाची हाक दिल्यानंतर आपण स्वतः दिनांक ४ जानेवारी २०२३ रोजी हस्तक्षेप करून संयुक्त कृती समिती सोबत बैठक घेऊन आश्वासित केले होते की, महावितरण कार्यक्षेत्रात येणाऱ्या समांतर वीज वितरण परवाना धोरणास आपण शासन व वीज उद्योग म्हणून विरोध करू व कुठल्याही प्रकारचे खाजगीकरण आपण होऊ देणार नाही यासाठी शासन म्हणून आपण सर्व ते प्रयत्न करू.

तरीही एम. एम. ई. आर. सी. यांनी अदानी इलेक्ट्रिसिटी व टोरेंट पॉवर यांचे महावितरण कार्यक्षेत्रातील ठाणे, वाशी, खारघर, उरण, भांडुप (अदानी) व वसई, विरार, पालघर, मीरा भाईंदर, कल्याण, नागपूर, बारामती, दौंड, पुणे या क्षेत्रासाठी टोरेंट पावर यांचा अर्ज स्वीकृत करून अंतिम सुनावणीसाठी पब्लिक नोटीस जाहीर करुन सुनावणी घेतली आहे. तसेच टाटा पावर लिमिटेड यांनी महावितरणच्या कार्यक्षेत्रातील छत्रपती संभाजी नगर, वाळूज एमआयडीसी, बदनापूर, जालना येथे समांतर परवान्यासाठी अर्ज करून पब्लिक नोटीस जाहीर केली आहे.

ह्या आधी सुद्धा फ्रेंचायझीच्या माध्यमातून अनेक शहरे विविध कंपन्यांना दिली होती, परंतु हा प्रयोग यशस्वी झाला नाही उलट वितरण कंपनीला ग्राहकांचा रोष पत्करावा लागला आणि फ्रेंच्यायझी परवाना रद्द करून महावितरणला पुन्हा हे काम स्वतःकडेच घ्यावे लागले. आता समांतर विद्युत वितरण म्हणजे महावितरणच्या पायाभूत सुविधा व असेट्सचा वापर करून त्याच शहरात आणखी एक किंवा अनेक खाजगी कंपन्यांना वितरणाची परवानगी देणे. हा एक घातक प्रकार आहे. यामुळे खाजगी कंपन्या महावितरण चे ग्राहक विविध अमिष देऊन आपल्याकडे खेचण्याचा जोरदार प्रयत्न करतील व वितरण कंपनीची सर्व यंत्रणा वापरून वितरण कंपनीलाच संपवतील आणि नंतर मनमानी पद्धतीने वीज दर वाढवून ग्राहकांचे शोषण करतील. जसे की टेलिकॉम क्षेत्रात झाले आहे. कामगारांना अनेक प्रकारे त्रास दिला जाऊन नोकरी सोडण्यास बाध्य केले जाईल. यामुळे सर्व कर्मचाऱ्यांमध्ये अस्वस्थता व दहशत पसरली आहे.

यासोबतच या तिन्ही वीज उद्योगातील बरेचसे धोरणात्मक व कर्मचाऱ्यांशी संबंधित प्रश्न प्रलंबित आहेत. ते आपल्या निदर्शनास आणून देत आहोत. :-

१) तिन्ही वीज कंपन्यातील विवीध मार्गाद्वारे वाढत असलेले कंत्राटीकरण व खाजगीकरण याला आमचा तिव्र विरोध असून शासन व व्यवस्थापणाचे हे धोरण आम्हाला मान्य नाही.

२) सोशल मिडीया व प्रेस मिडीया द्वारे मराठवाड्यातील १३ जिल्हे फ्रंचाईजीला जाणार असल्याच्या चर्चा सुरु असुन त्या संदर्भातील महावितरणची पी.पी.टी. सोशल मिडीयावर फिरत आहे. यास आमचा विरोध असून त्याबद्दल प्रशासनाने योग्य तो खुलासा करावा.

३) महावितरण बी/आर-२०३०, २६ फेब्रुवारी २०२० रद्द करावा व महावितरण कंपनीचे ३२९ उपकेंद्र दोन खाजगी एजन्सींना (ठेकेदारांना) चालविण्यास दिली आहे त्याचा मागील ६ महिन्यांचा अतिशय वाईट अनुभव असुन त्यांचे टेंडर रद्द करण्यात यावे.

४) तिन्ही कंपन्यातील सर्व रिक्त पदे भरण्याचा कालबध्द कार्यक्रम जाहीर करावा.

५) तिन्ही कंपनीतील वीज कर्मचारी अधिकारी अभियंता यांचा रोखुन धरलेले सानुग्रह अनुदान त्वरीत देण्यात यावे.

६) वितरण - पारेषण व वीज निर्मिती कंपनीच्या बदली धोरणाबाबत : ज्या कर्मचारी, अभियंते व अधिकाऱ्यांशी या प्रश्नाचा संबंध आहे. त्या संबंधितांशी स्टेक होल्डर्सशी चर्चा न करता जणू कांही हा फक्त व्यवस्थापणाच्या अधिकार क्षेत्रातील बाब समजून धोरण ठरवण्याची एकतर्फी पध्दत आहे. ती आम्हाला अमान्य असून आमच्यासोबत व कृती समितीतील संघटनांशी प्रथम चर्चा करून त्याची अंमलबजावणी व्हावी.

७) महावितरण कंपनीच्या पुर्नरचना प्रस्तावाबाबत :- पुर्नरचनेस आमचा विरोध नसून कामात बदल हा झालाच पाहिजे अशी महासंघ म्हणून आमची धारणा आहे व यात जनमित्र व इतर कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण कमी होणे आवश्यक आहे. जनमित्रास ८ तास ड्युटीचे नियोजन आवश्यक आहे. पुर्नरचना ही वारंवार होणारी बाब नसल्याने व्यवस्थापणाच्या प्रस्तावात सुधारणा होणे अवश्यक आहे. सध्या प्रायोगिक तत्त्वावर पुनर्रचना लागू आहे. त्यातही विस्कळीतपणा येऊन मागील दोन महिन्यामध्ये सर्व कामे जुन्या पद्धतीने चालू आहेत. पुर्नरचना अंतिम एम.पी.आर. करण्यापूर्वी संघटनेसोबत बैठक घेऊन सुधारित एम.पी.आर./प्रस्ताव दाखवावा त्यानंतर पुर्नरचनेचा निर्णय घेण्यात यावा. घाईगर्दीने त्यावर अंमलबजावणी करू नये.

८) महापारेषण कंपनीमध्ये रु.२०० कोटीच्या वरील प्रकल्प TBCB मध्ये देण्यास तीव्र विरोध महापारेषणच्या प्रकल्प राबविण्याच्या प्रक्रियेत TBCB (Tariff Based Competitive Bidding) पद्धतीला महासंघाचा ठाम विरोध आहे. ही पद्धत सार्वजनिक मालकीच्या व हिताच्या विरोधात असून त्यामुळे महापारेषणसारख्या संस्थेच्या आर्थिक व तांत्रिक क्षमतेवर परिणाम होतो. म्हणूनच, आम्ही या TBCB धोरणास कडाडून विरोध करत आहे. तसेच, सध्या लागू असलेली थ्रेशोल्ड लिमिट ही परिस्थिती व संस्थेच्या सक्षमता विचारात घेतल्यास अत्यंत कमी आहे. त्यामुळे, ही थ्रेशोल्ड लिमिट लक्षणीय वाढविणे अत्यावश्यक असून, त्याद्वारे महापारेषणला अधिक प्रकल्प स्वतः च्या माध्यमातून राबवण्याची संधी मिळू शकेल. आमची स्पष्ट मागणी आहे की, TBCB पद्धत तात्काळ थांबवण्यात यावी आणि सध्याची थ्रेशोल्ड लिमिट वाढवून महापारेषणला संधी व सामर्थ्य देण्यात यावे.

९) ॲनामली कमेटीचे गठण करण्याबाबत सन २०१९ च्या पगारवाढ करारानंतर प्रलंबीत असलेल्या विषयावर संचालक (मांस)

महावितरण यांच्या अध्यक्षतेत नेमलेल्या कमेटी पुढे तंत्रज्ञ, सर्व लाईन स्टाफ, यंत्रचालक, लेखा, मांस, अभियंते यांच्या विषयावर कमेटी गठीत करण्यात आली होती. कामगार संघटनांनी वास्तविकता मांडल्यानंतर समिती जे निर्णय घेणार त्याबाबत चर्चा न करता समितीने एकतर्फी निर्णय जाहीर केला ती चर्चा होणे आवश्यक आहे.

१०) सन २०२३ च्या पगारवाढ व अलाऊंन्सेस शिवाय इतर प्रश्नाकरीता व लाईनस्टाफ वेतन व कामाचे आठ तास बाबत ॲनामली कमेटी गठीत करणे. पगारवाढी वेळी मा. अप्पर मुख्य उर्जा यानी आपण फक्त वेतन व अलाऊंन्सेवर चर्चा करून करारापर्यंत पोहोचू उर्वरित प्रश्नंकरीता कमेटी गठीत करण्याचे मान्य केले होते ती कमेटी आजही झाली नाही ही कमिटी तातडीने गठित करुन सर्व प्रलंबित ॲनामली दूर कराव्यात.

११) वीज कर्मचारी, अभियंते व अधिकारी यांना पेन्शन मंजूर करण्याबाबत :- महाराष्ट्र शासनाच्या कॅबिनेट सबकमेटीने वीज कंपन्यातील सर्व कर्मचारी-अभियंते व अधिकाऱ्यांना सेवा निवृतीच्या दिवशी असणाऱ्या मुळ वेतनाच्या ४० टक्के पेन्शन व त्यावर येणारा महागाई भत्ता ही योजना स्वबळावर लागू करण्यास मान्यता दिली आहे. मा. उर्जा सचिवांनी मुंबई उच्च न्यायालयांत शपथपत्र सादर करून पेन्शनची मागणी सरकारने मान्य केल्याचे म्हटले आहे. महाराष्ट्र शासनाचे मा. राज्यपाल यांनी तसा अध्यादेशही निर्गमित केलेला आहे. मा. प्रधान उर्जा सचीवांच्या सुचनेनुसार शासनाचे मा. मुख्यमंत्री यांचे बरोबर पेन्शनवर झालेल्या चर्चेचा विस्तृत प्रस्ताव सर्व संबंधितांना सादर करण्यात आलेला आहे. त्याआधारे पेन्शनचा प्रश्न निकाली काढावा ही विनंती.

१२) महावितरण कंपनीतील लाईनस्टाफ वरील कामाच्या बोजा व होणारे प्राणांतिक अपघातासंदर्भात तातडीने कमिटी गठित करुन त्यांच्या कामाच्या तासामध्ये सुसुत्रता आणावी व प्राणांतिक अपघात कमी कसे होतील या संदर्भात कडक उपाययोजना करावी.

१३) सोबतच तिन्ही वीज कंपन्यातील ४३ हजार कंत्राटी कामगारांना कायम कामगाराची योग्य वेतनश्रेणी व दर्जा देण्याचा निर्णय घ्यावा :- या संबंधात ४३ हजार कंत्राटी कर्मचाऱ्यांना एकाटप्यात कायम करण्याबाबतच्या अडचणी लक्षांत घेउन संघटनांनी योग्य वेतन श्रेणीत त्यांना सामावून घेण्यासंबंधात विस्तृत प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यावर अंमलबजावणी व्हावी. या कामगारांनी १०-१५-२० वर्षे वीज उद्योगाला आपले कार्य-आयुष्य दिले आहे म्हणून त्यांना हा न्याय मिळाला पाहिजे. नुकतेच न्यायालयाने दिलेल्या ५६-५६ केसच्या निर्णयाची अंमलबजावणी व्हावी.

१४) मराठवाडयातील व महाराष्ट्रांतील उपकेन्द्रामधे सुरक्षा रक्षकांची नेमणुक करावी वीजेचे वितरण व वीज ग्राहकांशी उपकेंद्राचे महत्व व संवेदनशिल संबंध याचे महत्व व्यवस्थापणाला विशद करण्याची गरज नाही. उपकेंद्राची सुरक्षा महत्वाचा विषय असल्याने ज्या उपकेन्द्रात सुरक्षा रक्षकांची कमी संख्या आहे तिथे ते पुरवण्यात यावे असे निर्देश मुख्य कार्यालयाने द्यावे ही विनंती.

१५) विद्युत व इतर सहाय्यकांच्या कालावधी बाबत :- विद्युत साहाय्यक यांना नियुक्त करतांना ३ वर्षापर्यंत त्यांना मानधनावर कंत्राटावर पदस्थापना देणे अमानवीय आहे. कंपनीच्या कामाचा अनुभव व्हावा हा उद्देश न्यायोचित आहे. मात्र तीन वर्षापर्यंत अनुभव घ्यावा ही न पटणारी बाब आहे. हा सहाय्यक प्रथम २ वर्ष आय टी आय मधे शिक्षण व अनुभव घेतो व त्यानंतर ३ वर्षे म्हणजे एकूण ५ वर्ष त्याचे होणारे शोषण ही न पटणारी बाब आहे. तेच धोरण इतर सर्व साहाय्यकांना लागू करून एक वर्षाच्या अनुभवानंतर त्यांना कायम करण्यात यावे, ज्यांनी ३ वर्षाचा कालावधी पूर्ण केला आहे त्यांची सेवा उपदानाकरीता व सामान्य आदेश ७४ करीता ग्राह्य धरण्यात यावी.

१६) अधिनियम २०२२ अंतर्गत अधिसंख्य पदावर नियुक्त उमेदवारांना ३ वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्याने कायम (स्थायी) पदावर सामावून घ्यावे. महाराष्ट्र शासनाच्या अधिनियम २०२२ मधील तरतुदींनुसार, महावितरण कंपनीमध्ये जाहिरात क्र. ०५/२०१९ अन्वये SEBC प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारांसाठी अधिसंख्य पदे निर्माण करण्यात आली होती. त्यानुसार २७९ उपकेंद्र सहाय्यक आणि ३९१ विद्युत सहाय्यक अशा एकूण ६७० उमेदवारांना दि. २८.०९.२०२२ रोजी कंत्राटी पद्धतीने नियुक्ती देण्यात आली. त्यांचा कंत्राटी कालावधी पूर्ण होऊन ८ महिन्याचा कालावधी लोटूनही त्यांना अद्यापपर्यंत स्थायी आदेश देण्यात आले नाही. महावितरण प्रशासनाने त्या संदर्भात ऊर्जा खात्यास मार्गदर्शन मागवलेले असून लवकरात लवकर या सर्व सहाय्यकांना स्थायी आदेश देऊन नियुक्ती देण्यात

॥ श्रम ही आराधना ॥

# महाराष्ट्र वीज कामगार महासंघ

* प्रदेश कार्यालय *

(संलग्न भारतीय मजदूर संघ)

४, मार्शल आर्केड, राका कॉलनी, शरणपूर रोड, नाशिक-४२२ ०२२. दूरभाष : २५७९१६७, फॅक्स : (०२५३) २५७९१६७

नोंदणी क्रमांक : पी.एन. ८३३

* महामंत्री कार्यालय *

म. वी. कामगार महासंघ, मालखरे आर्केड, मराठवाडा सांस्कृतिक मंडळ रोड, खडकेश्वर, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००१. ई-मेल : arunpiwal777@gmail.com

| विठ्ठल भालेराव | संजय ढंडारे | सचिन पाटील | अरुण पिवळ |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | कार्याध्यक्ष | संघटन मंत्री | महामंत्री |
| मो. ९१५८२५५५९९ | मो. ८५५४९८८८९० | मो. ९६०४९२५८६५ | मो. ९४२२९६६१०७ |

यावी.

१७) महापारेषण कंपनीच्या स्टाफ सेटअप सोबतच अनामली कमिटी स्थापन करण्यात आली होती. परंतु सदर कमिटीत असणाऱ्या पूर्ण सदस्या सहित संघटनांबरोबर अद्याप एकही मिटिंग झालेली नाही. त्यामुळे अनामली मध्ये असलेले विषय तसेच अनिर्णित आहेत. अनामली कमिटीचे सर्व सदस्य व संघटनांचे प्रतिनिधी यांची बैठक तातडीने लावण्यात यावी व अनिर्णित विषयांचा निपटारा करण्यात यावा.

१८) महापारेषणमध्ये क्षेत्रीय तांत्रिक पदे इन ऑपरेटिव्ह करण्याबाबत आणि नवीन अधिकारी पदांच्या निर्मितीसाठी वर्ग ३ व वर्ग ४ कर्मचारी वर्गाच्या होत असलेल्या नुकसानीबाबत संघटनेचा तीव्र आक्षेप असून इन ऑपरेटिव्ह केलेली सर्व पदे परत ऑपरेटिव्ह करण्यात यावी.

१९) महानिर्मिती कंपनी तर्फे सद्यस्थितीत चालवण्यात येणारे सर्व जलविद्युत केंद्र हे महानिर्मितीकडे मालकी हक्काने हस्तांतरीत करण्याची प्रक्रिया शासन स्तरावर सुरू करावी.

२०) महानिर्मिती कंपनीचे सौर ऊर्जा प्रकल्प हे महानिर्मिती कंपनी कडे अधिकारी व कर्मचारी यांच्या मार्फत चालवण्यात यावे.

२१) प्रभारक श्रेणी १ आणि २ यांचे पदोन्नती पॅनल घेत असतांना २१० मे.वॅ संच या नुसार करण्यात येते परंतु काळाच्या गरजेनुसार आणि वाढलेले वीज मागणीनुसार आपण ५०० मे.वॅ. , ६६० मे. वॅ आणि ८०० मे.वॅ संच उभारलेले आहे परंतु या ठिकाणी प्रभाकर श्रेणी १ आणि २ जागा उपलब्ध करत नसल्यामुळे तंत्रज्ञ कर्मचारी यांच्या पदोन्नती जास्त प्रमाणात होत नाही. ५०० मे.वॅ , ६६० मे.वॅ तसेच ८८० मे.वॅ या संचात जागा उपलब्ध केल्यास २१० मे.वॅ संचाप्रमाणे नवीन प्रकल्प यात सुद्धा तंत्रज्ञ यांचे पदोन्नती होऊन श्रेणी १ आणि २ यांना न्याय देता येईल.

२२) महाराष्ट्र व महाराष्ट्र बाहेर वाढलेले वीज मागणीनुसार आपण ५०० मे.वॅ. , ६६० मे. वॅ आणि ८०० मे.वॅ संच उभारलेले जात आहे या नविन प्रकल्प उभारतांना या सोबत महानिर्मिती कंपनी मधील सर्व कर्डर्सच्या भरती प्रक्रिया होणे गरजेचे आहे.

मा. महोदय, छुप्या पद्धतीने होत असलेले अघोषित खाजगीकरण व प्रलंबित मागण्यासाठी महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे सभासद हे भारतीय मजदूर संघाच्या नेतृत्वाखाली दि. ८ व १६ एप्रिल २०२६ रोजी होणाऱ्या आक्रोश मोर्चा मध्ये प्रचंड संख्येने सहभागी होतील.

खाजगीकरण व समांतर वीज परवाना धोरणास महाराष्ट्रातील विज उद्योगांमधील सर्व कर्मचारी अधिकाऱ्यांचा विरोध आहे. त्यामुळे साहेबांना विनंती आपण या उद्योगाचे कुटूंबप्रमुख व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून हस्तक्षेप करून समांतर वीज परवानाच्या अनुषंगाने येणारे अघोषित खाजगीकरण धोरण रद्द करावे व तातडीने समांतर वीज परवाना व पुढील प्रलंबित विषयासाठी आपल्या स्तरावर उच्चस्तरीय बैठकीचे आयोजन करावे ही विनंती.

आपला

अरुण पिवळ
महामंत्री
महाराष्ट्र वीज कामगार महासंघ (BMS)

प्रत :-
१) मा. अप्पर मुख्य ऊर्जा सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
२) मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सुत्रधारी कंपनी, मुंबई
३) मा. व्यवस्थापकीय संचालक, महावितरण, महापारेषण, महानिर्मिती सांघिक कार्यालय, प्रकाशगड, प्रकाशगंगा, मुंबई
४) मा. संचालक संचलन, महावितरण, महापारेषण, महानिर्मिती सांघिक कार्यालय, प्रकाशगड, प्रकाशगंगा, मुंबई
५) मा. संचालक (मांस), महावितरण, महापारेषण, महानिर्मिती सांघिक कार्यालय, प्रकाशगड, प्रकाशगंगा, मुंबई
६) मा. मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महावितरण, महापारेषण, महानिर्मिती सांघिक कार्यालय, प्रकाशगड, प्रकाशगंगा, मुंबई

माहितीस्तव :
१) मा. अध्यक्ष/महामंत्री, भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेश / विदर्भ प्रदेश
२) मा. अध्यक्ष/महामंत्री, अखिल भारतीय मजदूर महासंघ
३) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र वीज कामगार महासंघ, नागपूर
४) मा. सर्व केंद्रीय पदाधिकारी, महाराष्ट्र वीज कामगार महासंघ

।। श्रम ही आराधना ।।

# महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ

( संलग्न भारतीय मजदूर संघ - र.नं.पी.एन.३९७८-२००९ )


| निलेश खरात | सचिन मेंगाळे | राहुल बोडके | उमेश आणेराव | सागर पवार |
|---|---|---|---|---|
| अध्यक्ष | सरचिटणीस | कार्याध्यक्ष | संघटन मंत्री | कोषाध्यक्ष |
| मो. ९८२२४१८३९५ | मो.९४२२०३७०२९ | मो. ९५५२८७४८२१ | मो. ९९७०००४४७४ | मो. ९८९०१ ६९६६७ |

● mvkksangh@gmail.com ● विश्वकर्मा भवन, १८५, शनिवार पेठ, पुणे - ४११०३० ● www.mvkksangh.com


जा. क्र. : 2703 दिनांक : 27/03/2026

प्रती

१) मा.ना.देवेंद्रजी फडणवीस
मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री
महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई.

२) मा.आकाशजी फुंडकर
कामगार मंत्री
महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई.

३) मा.कामगार आयुक्त
महाराष्ट्र राज्य, महाराष्ट्र शासन
बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स बांद्रा, मुंबई.

४) मा.आभा शुक्ला मॅडम
अपर प्रधान सचिव (ऊर्जा)
महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई.

५) मा.व्यवस्थापकीय संचालक
महावितरण / महानिर्मिती / महापारेषण

**विषय : मा.ना.देवेंद्रजी फडणवीस साहेब तत्कालीन ऊर्जामंत्री यांनी दि. ९ सप्टेंबर २०२४ रोजी महावितरण, महापारेषण व महानिर्मिती कंपनीला दिलेल्या सुचनेंचे पालन न केल्याने व राज्यातील अन्य वीज कंत्राटी कामगार निगडीत अनेक समस्यां साठी गुरुवार दि. १६ एप्रिल २०२६ राज्य कामगार आयुक्त कार्यालय बांद्रा येथे आक्रोश धरणे आंदोलन व पूढे प्रकाशगंगा व प्रकाशगड बांद्रा मुंबई येथे तिन्ही वीज कंपनीच्या प्रमुख कार्यालयावर पायी मोर्चा काढणे बाबत.**

संदर्भ :

१ ) दि.२९ ऑगस्ट २०२४ रोजी मा.ना.देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी देवगिरी बंगल्यावर महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघा सोबत केलेली चर्चा.

२ ) दि.९ सप्टेंबर २०२४ रोजी मा.ना.देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी भारतीय मजदूर संघ व महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघासोबत हरियाणा पॅटर्न लागु करावा या बाबत झालेल्या चर्चेचा इतिवृत्तांत

३ ) महापारेषण कंपनीत वायरमन ट्रेड ला संधी मिळावी या साठी आझाद मैदान मुंबई येथे १० व ११ ऑक्टोबर २०२३ रोजी केलेले आंदोलन व याच विषया साठी दि. १ मे २०२५ रोजी महापारेषणच्या प्रकाशगंगा कार्यालया समोर पुकारलेले आंदोलन जे मा.पोलीस व वीज कंपनी प्रशासनाच्या विनंतीला मान देऊन स्थगित केले.

मा.महोदय, सप्रेम नमस्कार

राज्याचे तत्कालीन ऊर्जामंत्री मा.ना.देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी दि. ९ सप्टेंबर २०२४ रोजी सह्याद्री शासकीय निवासस्थानी भारतीय मजदूर संघ व महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघा सोबत एकूण २ बैठका घेतल्या त्या बैठकीचा इतिवृत्तांत भारतीय मजदूर संघ व महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघास मिळाला या बैठकीला १ वर्ष ७ महिने पूर्ण झाले.

मा.ना.ऊर्जामंत्री महोदय यांच्या अध्यक्षते खाली झालेल्या बैठकीत भारतीय मजदूर संघ व महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे प्रमुख पदाधिकारी तसेच मा.अपर प्रधान सचिव ( ऊर्जा ) प्रधान सचिव ( कामगार ) महावितरण महापारेषण व महानिर्मिती या कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक व अन्य सक्षम प्रमुख अधिकारी उपस्थित होते या वेळी मा.ऊर्जामंत्री यांनी त्या बैठकीत खालील

आदेश / निर्देश दिले होते. मात्र यातील अनेक बाबींची पूर्तता तिन्ही वीज कंपनी प्रशासनाने मागील १ वर्ष ७ महिन्यात पूर्ण केली नसल्याने ऊर्जामंत्री मा.ना. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या आदेशाचा अवमान झाला, तसेच या मुळे राज्यातील हजारो वीज कंत्राटी कामगारांचे आर्थिक, सामाजिक व मानसिक नुकसान होऊन शासन व वीज कंपनी प्रशासन तसेच ऊर्जामंत्री मा.ना.देवेंद्रजी फडणवीस साहेब यांची प्रतिमा जनमानसात मलीन झाल्याचे चित्र सोशल मीडिया व अन्य माध्यमातून दिसून आले.

राज्याचे ऊर्जामंत्री मा.ना.देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी सर्व संबंधित प्रमुख यांची बैठक घेऊन खालील आदेश वजा सूचना केल्या होत्या मात्र १ वर्ष ७ महिन्यातया आदेश वजा सूचनांची पूर्तता सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी न केल्याने या पत्राच्या विषयानुसार व वीज कामगार यांच्या हितार्थ भारतीय मजदूर संघाच्या नेतृत्वाखाली दि.१६ एप्रिल २०२६ रोजी हे आंदोलन महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ नाईलाजाने करत आहे.

## ऊर्जामंत्री मा.ना.देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी दि. ९ सप्टेंबर २०२४ रोजी दिलेले आदेश वजा सूचना खालील प्रमाणे आहेत

१ ) वीज कंपनीतील सर्व वीज कंत्राटी कामगारांना हरियाणा पॅटर्न नुसार कंत्राटदार मुक्त व वयाच्या ६0 वर्षापर्यंत शाश्वत रोजगार ( जॉब सिक्युरिटी ) मिळावी या साठी हा विषय महाराष्ट्र मंत्रीमंडळा समोर मांडण्याची जबाबदारी प्रधान सचिव कामगार यांनी घेतली. मात्र मागील १ वर्ष ७ महिने एवढा दीर्घ कालावधीत उलटल्यानंतर देखील राज्यातील लाखो कांमगारांच्या हितार्थ असलेला हा विषय आजवर मंत्रीमंडळा समोर आला नाही.

२ ) महावितरण महापारेषण व महानिर्मिती या कंपनीतील वीज कंत्राटी कामगारांना १९ % पगार वाढ फरका सह घोषित केली होती मात्र मागील १ वर्ष ७ महिन्या नंतर देखील राज्यातील हजारो वीज कंत्राटी कामगारांना या १९% वेतन वाढीच्या फरकाची रक्कम ही मिळालीच नाही.

३ ) महावितरण सातारा येथील एका विशिष्ट संघटनेच्या कंत्राटदारावर कंत्राटी कामगारांची दिशाभूल करून १ कोटी ६५ लाखाचा अपहार केल्याचा गुन्हा सातारा पोलिसात दाखल होऊन न्यायालयाने त्यांना १५ दिवसाची पोलीस कोठडी दिली अशा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व कामगार कायदे पायदळी तुडवत कायदेशीर कागदपत्रांची पूर्तता नसतांना देखील सातारा महावितरण प्रशासन व सातारा कामगार आयुक्त कार्यालय यांच्या कडून पुन्हा पुन्हा शासनाचा महसूल बुडवणाऱ्या त्याच कंत्राटदाराला वर्षानुवर्षे संगनमताने कशी टेंडर दिले जातात हे प्रकरण तसेच नांदेड हिंगोली, परभणी बीड येथे बोगस बँक खाते काढून त्या मार्फत आर्थिक गैरव्यवहार तसेच झालेली आर्थिक फसवणूक याची चौकशी अजून झाली नाही, तसेच राज्यातील अन्य जिल्ह्यातील अनेक भ्रष्ट कंत्राटदार यांच्या आर्थिक शोषणाच्या तक्रारी व गैरकृत्याची चौकशी अद्याप ही महावितरण च्या अधिकाऱ्यांनी केली नसल्याने आमच्या संघटनेचे अनेक पदाधिकारी हे अनेक वर्षे / अनेक महिने रोजगारा पासून वंचित राहिले. आपल्याच महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभाग व महावितरण मधील काही अधिकारी हे वीज उद्योगाशी निगडित असलेल्या काही विशिष्ट संघटनेशी निगडित असलेल्या भ्रष्ट कंत्राटदारांना आम्ही तक्रारी करून देखील जाणीवपूर्वक पाठिशी घालत आहेत त्यांना अभय देत आहेत या मागे मोठे आर्थिकहित संबंध असल्याचा संशय आहे याची आता तरी सखोल चौकशी व्हावी व या बाबत काय पुढे काय कार्यवाही झाली हे संघटनेला कळवावे.

४ ) न्यायालयीन प्रक्रियेत नावे असलेल्या कामगारांची नावे ही संपर्क पोर्टल वर विशेष रंगात दाखवली गेली तर कामगारांचा रोजगार सुरक्षित राहील व मा.न्यायालयाचा अवमान होणार नाही हे अत्यंत साधे काम मागील १ वर्ष ७ महिन्यात झाले नाही.

५ ) मा.न्यायालयीन प्रक्रियेत सहभागी राज्यातील सर्व वीज कंत्राटी कामगारांच्या याद्या महावितरणच्या शेवटच्या असिस्टंट इंजिनिअर पर्यंत ई मेल द्वारे द्यायाव्यात जेणे करून कामगारांचा रोजगार सुरक्षित राहील व मा.न्यायालयाचा अवमान होणार नाही या सूचना असतांना देखील महावितरण कंपनी प्रशासनाने हे १0 मिनिटात पूर्ण होऊ शकणारे क्षुल्लक काम देखील मागील १ वर्ष ७ महिन्यात केले नाही. हा विषय संशयास्पद व काही अधिकारी व कंत्राटदरांच्या आर्थिक हितसंबंधीचा वाटतो.

६ ) महावितरण भरती मध्ये अनुभवी वीज कंत्राटी कामगारांना जादा १० मार्क दिले व वयात ४३ वयापर्यंत फॉर्म् भरण्याची सवलत दिली मात्र हे मार्क प्रत्यक्ष कामगारांना दिले अथवा नाही या बाबत अनेक कामगारांना शंका आहेत.

७ ) राज्यातील सर्व वीज कंत्राटी कामगारांचे वेतन हे सर्व कंत्राटदारांनी राष्ट्रीयकृत बँकेतच करावे व याची पाहणी व देखरेख ही महावितरणच्या अधिकारी वर्गाने करावी अशा स्पष्ट असतांना देखील आज अनेक कामगारांना फसवून त्यांच्या सहमती शिवाय त्यांच्या आधार व पॅन कार्ड चा गैरवापर करून परस्पर गल्ली बोळातील साध्या पतसंस्थेत या वीज कंत्राटी कामगारांची परस्पर बँक खाती काढुन शासकीय संविधानिक देय रकमेचा परस्पर अपहार केला जात आहे यावर संघटना ठाम आहे.

८ ) संघटनेने मा.मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली मा.औद्योगिक न्यायालयाने २२८५ वीज कंत्राटी कामगार यांना कायम समजावे व सर्व आर्थिक लाभ त्वरित देण्यात यावे असे आदेश महावितरणला दिले आहेत अद्याप याची अंमलबजावणी झाली नाही. ही अंमलबजावणी तातडीने करावी या साठी आपण विशेष सूचना महावितरण ला द्याव्यात ही नम्र विनंती.

९ ) संघटनेने २०१९ साली पुणे ते मुंबई पायी मोर्चा काढला तेव्हा तिन्ही वीज कंपनीतील कंत्राटी कामगारांना २० % पगारवाढ तत्कालीन ऊर्जामंत्री मा.चंद्रशेखर बावनकुळे साहेब यांनी दिली तसेच त्यांनीच कामगार हितार्थ संपर्क पोर्टल चालू केले याच मीटिंग मध्ये महावितरण व महापारेषण कंपनीतील सर्व कंत्राटी कामगारांना महानिर्मिती कंपनीला लागू असलेले सर्व भत्ते देण्याच्या सूचना मा.चंद्रशेखर बावनकुळे साहेबांनी २०१९ साली महावितरण व महापारेषण प्रशासनाला सूचित केले होते त्या बैठकीचा इतिवृत्तांत संघटनेला मिळाला मात्र अजूनही महानिर्मिती कंपनीतील वीज कंत्राटी कामगारांना मिळणारे विशेष भत्ते हे महावितरण व महापारेषण कंपनी प्रशासना कडून सर्व वीज कंत्राटी कामगारांना मिळावे.

१० ) राज्यातील अनेक जिल्ह्यात कार्यरत वर्षानुवर्षे काम करत असलेले अनुभवी वीज कंत्राटी कामगारांच्या कष्टाच्या घामाच्या वेतनावर दर महिन्याला आर्थिक डल्ला मारणाऱ्या तसेच रोजगार देताना कंत्राटदारांच्या आर्थिक मागण्यांची पूर्तता न केल्याने कामगाराला जाणीवपूर्वक रोजगार न देणे, त्या कामगारांची दूर अंतरावर बदली करणे हे धंदे केवळ आर्थिक आकसापोटी काही प्रशासकीय अधिकारी व काही कंत्राटदार संगनमताने करतात असे चित्र राज्यभर अनेक जिल्ह्यात दिसून येते या वर्षानुवर्षे संघटना करत असलेल्या तक्रारीकडे वीज कंपनी मुख्यालय प्रशासनाने देखील जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे आता यात बदल झाला पाहिजे या राज्यातील महावितरण कंपनीतील कंत्राटी कामगारांवर आर्थिक अन्याय करणाऱ्या व त्यांच्या स्वार्थासाठी नाहक रोजगार घालवणाऱ्या कंत्राटदारांचे कंत्राट तातडीने रद्द करून त्यांना राज्यभरात कोठे ही पुन्हा टेंडर भरता येणार नाही अशा पद्धतीने काळ्या यादीत टाकावे.

११ ) महानिर्मिती कंपनीतील अनेक वीज निर्मिती केंद्रातील काही वीज कंत्राटी कामगारांना कॉम्प्रेहेनसिव्ह टेंडर प्रमाणे रोजगार मिळतो यामुळे या कामगारांना वाढीव पगार व महागाई भत्ते यात न मिळाल्यामुळे त्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थीक नुकसान होते या साठी त्यांच्या टेंडर मध्ये पि.वी क्लॉज टाकण्यातब्या वे

१२ ) महापारेषण सिंधुदुर्ग व रत्नागिरी येथील कंत्राटदाराने संघटनेचे पदाधिकारी व उच्चशिक्षित असलेले कुशल अनुभवी वीज कंत्राटी कामगारांनी त्याची आर्थिक पूर्तता न केल्याच्या आकसापोटी कामावरुन कमी करून नवीन कामगारांकडून पैसे घेऊन जुन्या कामगारांच्या जागेवर लावले आहे. या राज्यातील महापारेषण कंपनीतील कंत्राटी कामगारांवर आर्थिक अन्याय करणाऱ्या व त्यांच्या स्वार्थासाठी नाहक रोजगार घालवणाऱ्या कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकावे.

१३ ) वीज कंपन्यात टेंडर घेण्यासाठी आर्थिक दृष्ट्या सक्षम नसलेल्या व आपल्याच वीज कंपन्यांतील काही संघटनेच्या नेतृत्वाच्या वरदहस्ताने राज्यात अनेक सुशिक्षित बेरोजगार संस्थाचे कार्यकारी संचालक मंडळ वीज कंत्राटी कामगारांच्या कष्टाच्या, घामाच्या वेतनाचे व शासकीय संविधानिक देय असलेल्या रकमेवर दिवसा ढवळ्या अनेक वर्षे डल्ला मारत आहेत आधी यांना टेंडर देणे बंद करून यांचे ऑडिट व्हावे तो पर्यंत आर्थिकदृष्ट्यां सक्षम असलेलेच कंत्राटदार नियुक्त करण्यात यावेत हरियाणा पॅटर्न राज्यात लागू होई पर्यंत टेंडर प्रक्रिया व कंत्राटी कामगार यांच्या साठी लागू असलेल्या ५३६ परिपत्रकात बदल

करण्यात यावे व वीज कंत्राटी कामगारांच्या तक्रारी निवारण करण्यासाठी तातडीने एक कमेटी स्थापन करावी व या कमिटी मध्ये आमच्या संघटनेचे ३ पदाधिकारी यांचा समावेश असावा. मागील काळातील दोषी कंत्राटदारांची तातडीने चौकशी व्हावी. कंत्राटदारांची तक्रार नोंदवण्या करता वीज कंपन्यांनी एक ई मेल आयडी जाहीर करावा जेणे करून कामगार निर्भीडपणे तक्रार करतील व तक्रार निवारण समिती सदस्य त्यावर काम करतील

एकंदरीत राज्याचे ऊर्जामंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेबांनी या कष्टकरी वीज कंत्राटी कामगार हितार्थ ९ सप्टेंबर २०२४ रोजी बैठक घेतली अनेक समस्या सुटतील अशा सुचना दिल्या मात्र वीज कंपनी प्रशासन जास्त करून महावितरण प्रशासनाने मा.ऊर्जामंत्री यांच्या सूचना व आदेशाचे पालन मागील दीड वर्षात केले नाही या मुळे मा.ऊर्जामंत्री व सर्व शासकीय यंत्रणेचा अवमान होऊन कामगारांवर होणाऱ्या अन्यायात पुन्हा प्रचंड वाढ झाली या विरोधात कामगार आक्रोश मोर्चा हा भारतीय मजदूर संघाने दि. १६ एप्रिल २०२६ रोजी राज्य कामगार आयुक्त कार्यालाय, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स बांद्रा मुंबई येथे काढणार आहोत याची कृपया नोंद घ्यावी

**या आंदोलनाचा एक भाग म्हणून १६ एप्रिल २०२६ रोजी राज्य कामगार आयुक्त कार्यालय, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स बांद्रा मुंबई ते महापारेषणचे मुख्यालय प्रकाशगंगा व तेथून पुढे महावितरण व महानिर्मिती कंपनीचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगड या कार्यालयावर महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ संलग्न भारतीय मजदूर संघाचे हजारो कामगार आक्रोश पायी मोर्चा या तिन्ही वीज कंपनीच्या मुख्यालयावर काढणार आहोत.**

आजवर संघटनेला उर्जामंत्री, शासन व वीज कंपनी प्रशासनाकडून अनेक आश्वासने मिळाली, अनेक इतिवृत्तानंत मिळाले मात्र त्यातील अनेक महत्वाच्या बाबींची अंमलबजावणी व ठोस उपाय योजना अद्याप झाली नाही त्यामुळे मा.ना.ऊर्जामंत्री महोदयांच्या सुचनांची प्रभावी अंमलबजावणी न करणाऱ्या दोषी संस्था व व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी

प्रत माहिती व पुढील कार्यवाही साठी :
१ ) मा.सह सचिव, मुख्यमंत्री सचिवालय नागपूर.
२) मा.मेघना ताई बोर्डीकर राज्यमंत्री ( ऊर्जा )
३ ) मा. आशीषजी जयस्वाल राज्यमंत्री ( कामगार )
४ ) मा.प्रधान सचिव, ( कामगार ) मंत्रालय मुंबई.
५ ) मा.अनिलजी ढुमणे, प्रदेश अध्यक्ष, भारतीय मजदूर संघ.
६ ) मा.किरणजी मिलगीर प्रदेश महामंत्री, भारतीय मजदूर संघ.
७ ) मा.सि.वी.राजेशजी क्षेत्र संघटन मंत्री, भारतीय मजदूर संघ
८ ) मा.अण्णाजी देसाई, ज्येष्ठ मार्गदर्शक वीज कामगार महासंघ व वीज कंत्राटी कामगार संघ.
९ ) मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स पोलीस स्टेशन बांद्रा.मुंबई.
१० ) मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक निर्मळनगर पोलीस स्टेशन, बांद्रा, मुंबई.
११ ) मा.मुख्य अभियंता............झोन ऑफिस, महावितरण / महापारेषण / महानिर्मिती
१२ ) मा.अधीक्षक अभियंता............परिमंडळ, महावितरण / महापारेषण / महानिर्मिती

आपले नम्र

अध्यक्ष
निलेश खरात
महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ.
Mob.: 9822418395

सरचिटणीस
सचिन मेंगाळे
महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ.
Mob.: 9422037029

॥ श्रम ही आराधना ॥

# महाराष्ट्र राज्य बिडी कामगार संघ

(संलग्न : भारतीय मजदूर संघ)

रजि. नं. पी.एन. ७०७ दि. १०/१२/१९७४

विश्वकर्मा भवन, १८५, शनिवार पेठ, पुणे - ४११ ०३०

E-mail : bms23july@gmail.com दूरध्वनी : ०२० - २४४५२०२०.


दि : १६-०४-२०२६

प्रति,

(१) मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य

(२) मा.कामगार मंत्री महाराष्ट्र राज्य

(३) मा.कामगार आयुक्त महाराष्ट्र राज्य

**विषय** : बिडी कामगारांच्या किमान वेतनाची अंमलबजावणी व अन्य प्रश्नांबाबत.

महोदय,

महाराष्ट्रातील २.५६ लाख बिडी कामगार सोलापुर, पुणे, मुंबई, गोंदीया, नागपुर, भंडारा, नांदेड, जालना, अहिल्यानगर, नाशिक, संगमनेर इ. ठिकाणी बिडी वळण्याचे काम करत आहेत. परंतु सन १९९७ पासून किमान वेतन मिळत नसल्यामुळे कायदेशीर किमान वेतन व अन्य सोयीसुविधांपासून बिडी कामगार वंचित आहेत. याबाबत निवेदन की,

(१) महाराष्ट्र शासनाने किमान वेतन अधिनियमांतर्गत मिळालेल्या अधिकाराचा वापर करून दि.१०-११-२०१४ रोजीच्या अधिसुचनेने क्र.किवेअ/१०१४/७७५/प्र.क्र.२०८/ कामगार-७ बिडी उद्योगात काम करणाऱ्या बिडी कामगारांसाठी प्रतिदिन प्रतिहजार बिडीस किमान वेतनाचे दर निश्चित केले आहेत. सोबत संबंधित अधिसुचनेची प्रत जोडत आहे. सदरील अधिसुचनेनुसार बिडी कामगारांना **मुळ वेतन रू.२१०/- + महागाई भत्ता रू.१६८.८० = एकूण किमान वेतन रू.३७८.८० मिळणे आवश्यक आहे. प्रत्यक्षात आज रोजी प्रतिहजार बिडीस रू.२३०.४० दराने वेतन मिळत आहे.** प्रतिहजार बिडीस रू.१४८.४१ रुपयाने किमान वेतनदारापेक्षा कमी वेतन मिळत आहे म्हणून नोटीफिकेशन लागु झाल्यापासून किमान वेतनातील फरक मिळणे आवश्यक आहे.

(२) इंडियन लेबर कॉन्फरन्सने १९९७ साली केलेल्या ठरावानुसार किमान वेतनाचे नॉमर्स निश्चित केले आहेत. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या रेप्टाकॉस केसमधील निर्णयानुसार किमान गरजांचे निकष ठरविण्यात आलेले आहेत. किमान वेतन बास्केटमध्ये अन्न, वस्त्र, निवारा इ. बाबींची व किमान गरजांची बास्केट विचारात घेऊन महाराष्ट्र शासनाने किमान वेतन कायद्यानुसार बिडी कामगारांचे पीस रेट पध्दतीने प्रतिहजार बिडीस किमान वेतनाचे दर जाहीर केलेले आहेत. महाराष्ट्र शासनाचे किमान वेतनाचे नोटीफिकेशन कायदेशीर व योग्य असल्यामुळे बिडी कारखानदाराने कोणतेही आक्षेप अथवा हरकती घेऊन न्यायालयातून स्थगिती आदेश मिळविलेले नाहीत म्हणून दि.१०-११-२०१४ रोजीचे नोटीफिकेशन बिडी कामगारांना सद्यस्थितीत लागु आहे. किमान वेतन

कायद्यानुसार किमान वेतन देणे मालकांवर बंधनकारक केलेले असतानाही बिडी कारखानदार सन १९९७ सालापासून बिडी कामगारांना किमान वेतन देत नाही आणि कायद्याचा मोठ्या प्रमाणात भंग व उल्लंघन होत आहे.

(३) बिडी ॲन्ड सिगार वर्कर्स (कंडीशन ऑफ एम्प्लॉयमेंट) ॲक्ट १९६६ च्या कायद्यानुसार सक्षम अधिकारी यांनी कायद्यानुसार किमान वेतनाचे व कायदेशीर बाबींचे पालन होते की नाही हे तपासूनच लायसन्स देणे व नुतनीकरण करणे कायद्याने बंधनकारक आहे, परंतु सक्षम अधिकारी कोणतीही तपासणी अथवा चौकशी न करताच बिडी कारखानदारांचे लायसन्स नुतनीकरण करत आहे म्हणून बिडी कामगारांना किमान वेतन मिळत नाही.

(४) मे.सहाय्यक आयुक्त तथा प्राधिकारी किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत कलम २०(२) अन्वये प्रकरण क्र.किवेअ/०७/२०२३ दाखल केलेल्या प्रकरणामधे दि.१२-०२-२०२४ रोजी किमान वेतन देण्याचे आदेश व दुप्पट दराने नुकसान भरपाई द्यावी असे बिडी कारखानदारांना कायदेशीर आदेश दिले आहेत. आदेशाची अंमलबजावणी अद्यापपर्यंत झाली नसल्याने बिडी कामगार किमान वेतनापासून वंचित आहेत. सोबत वरील आदेशाची प्रत जोडत आहे.

(५) बिडीवरील जी.एस.टी. २८% वरून १८% कमी करण्यात आला आणि बिडीच्या तेंदुपत्त्यावरील जी.एस.टी. १८% वरून ५% करण्यात आला. या कर कपातीचा फायदा बिडी कामगारांना मिळावा व किमान वेतन देण्यात यावे म्हणून मा.कामगार मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दि.१६-०३-२०२५ रोजी संघटनेने दिलेल्या निवेदनाची कोणतीही दखल अद्यापपर्यंत घेतली गेली नाही अथवा किमान वेतन मिळालेले नाही.

(६) मा.उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बिडी कामगारांच्या किमान वेतन अंमलबजावणीकरीता दि.०९-०९-२०२४ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार कामगारमंत्री यांनी बिडी कामगार व मालक यांच्या संयुक्त बैठकीचे आयोजन अद्यापपर्यंत केले नाही. सोबत संबंधित इतिवृत्ताची प्रत जोडत आहे.

(७) बिडी कामगारांची उपजीविका संपूर्णपणे बिडी रोजगारावर अवलंबुन आहे. बिडी रोजगाराव्यतिरिक्त त्यांना उत्पन्नाचे अन्य साधन नाही. मिळालेल्या अल्प उत्पन्नातुन किमान गरजांची पुर्तता करणे व महागाईस तोंड देणे अवघड झाले आहे. किमान वेतन मिळत नसल्यामुळे अनेक समस्या व त्रासांना तसेच आर्थिक व सामाजिक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. आज रोजी बिडी कामगारांचे जीवनमान खालावले असून अत्यंत दयनीय, गरिबीचे, लाजीरवाणे व हलाखीचे जीवन जगत आहेत.

(८) बिडी कारखानदार ९०% उत्पादन कंत्राटदारामार्फत करून घेतात. यामध्ये मुळ मालकच किमान वेतन देत नसल्यामुळे कंत्राटदार व उपकंत्राटदार यापेक्षा कमी वेतन देतात. सर्वात जास्त रू.२३०.४० पै. प्रतिहजार बिडीस पश्चिम महाराष्ट्रात मिळत असून यापेक्षा

कमी वेतन विदर्भ, मराठवाडा व कोकण प्रांतामध्ये मिळत आहे. बिडी कामगारांना वेतन चिठ्ठी अथवा नेमणुक पत्र मिळत नसल्यामुळे कायदेशीर कारवाई करण्यामधे अडचणी येतात व किमान वेतन मिळत नाही.

पीस रेट पध्दतीने काम केल्यामुळे दीर्घकाळ काम करूनही कमी वेतन हातामध्ये येते. हातावर पोट असलेल्या बिडी कामगारांना मिळणारे वेतन अल्प असल्याने दैनंदीन गरजेच्या वस्तुही विकत घेता येत नाहीत. बिडी कारखानदार महिलांच्या सहनशीलतेचा व मजबुरीचा गैरफायदा घेऊन शोषण व अन्याय करत आहेत. बिडी कामगार असंघटीत, अशिक्षीत, महिला कामगार असल्यामुळे सामुहिक सौदेबाजीची ताकद त्यांच्यात नाही. कायदेशीर किमान वेतन मिळण्यासाठी अंमलबजावणी यंत्रणा व शासकीय मदतीची बिडी कामगार अपेक्षा करत आहेत. बिडी कामगारांना आर्थिक दृष्टचक्रातुन बाहेर काढण्यासाठी किमान वेतन मिळणे हा एकमेव मार्ग आहे. तरच घटनेनुसार जगण्याचा खरा अधिकार प्राप्त होईल अन्यथा रोजगाराविना जीवन जगणे व्यर्थ आहे याचा विचार करून कायदेशीर किमान वेतनाची अंमलबजावणी होणे अत्यंत आवश्यक व गरजेचे आहे.

**तरी आपणांस नम्र विनंती की,**

अ. बिडी कामगार व मालक यांच्या संयुक्त बैठकीचे आयोजन व्हावे.

ब. बिडी कामगारांना महाराष्ट्र शासनाने निश्चित केलेला प्रतिहजार रू.३७८.४१ पै. हा दर मागील फरकासहीत मिळावा.

क. किमान वेतन कायद्याचा भंग करणाऱ्या बिडी कारखानदार व कंत्राटदारावर कठोर कायदेशीर कारवाई व्हावी आणि जास्तीत जास्त दंड व्हावा.

ड. न्यायाचे दृष्टीने अन्य ते हुकूम संबंधितांना देण्यात यावेत.

आपले विश्वासू

**( उमेश विश्वाद )**
सरचिटणीस

**( अर्जुन चव्हाण )**
अध्यक्ष

**सोबत :**

(१) दि.१०-११-२०१४ रोजीचे किमान वेतनाचे नोटीफिकेशन
(२) सक्षम प्राधिकारी यांचे दि.१०-०२-२०२४ रोजीचे आदेशाची प्रत.
(३) दि.०९-०९-२०२४ रोजीचे इतिवृत्त
(४) बिडी कामगारांच्या मागण्या

॥ श्रम ही आराधना ॥

# महाराष्ट्र सुरक्षा रक्षक महासंघ

## (संलग्न - भारतीय मजदूर संघ)

नोंदणी क्र.: ए.एल.सी./कार्यासन-१७/११२१२

दुरध्वनी - ०२२-२४७१ ३२८३ / २४७० ९५५८ | भ्रमणध्वनी - ९८५००९५०१७ / ९६६४३३२११४

**नोंदणी कार्यालय - २५, इब्राहीम मेन्शन, डॉ. आंबेडकर रोड, परळ, मुंबई - १२. ई-मेल - mhsrbms@gmail.com**


प्रति

मा. नामदार श्री आकाशजी फुंडकर

कामगार मंत्री महाराष्ट्र राज्य

मंत्रालय मुंबई ३२.

विषय - १६ एप्रिल २०२६ च्या BMS आक्रोश मोर्चा निमित्ताने सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या प्रलंबित मागण्या व प्रश्न..

महोदय

महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळात कार्यरत असणाऱ्या सुरक्षारकांचे विविध प्रश्न गेल्या अनेक काळापासून प्रलंबित आहे. याबाबत वेळोवेळी निवेदन देण्यात आली आहे. ते आपणास सादर करत आहोत ते पुढील प्रमाणे - .

१. महाराष्ट्र सुरक्षा रक्षक सल्लागार समितीची मुदत संपून दोन वर्ष झाले असल्याने सदर समितीची स्थापना लवकरात लवकर करण्यात यावी.

२. सुरक्षारक्षक मंडळामार्फत काम करणाऱ्या सर्व सुरक्षा रक्षकांना कामगार कल्याण मंडळाच्या योजना मंडळा मार्फत लागू करण्यात याव्यात.

३. प्रादेशिक परिवहन कार्यालय (मोशी) पिंपरी, जिल्हा पुणे येथील कार्यरत सुरक्षा रक्षकांना एप्रिल २०२३ ते मार्च २०२६ असे ३५ महिन्यांचे वेतन अद्याप मिळालेले नाही. तरी सदर वेतन त्वरित मिळावे.

४. महिला व बाल विकास विभाग अंतर्गत पंडित जवाहरलाल नेहरू उद्योग केंद्र येरवडा आणि शासकीय महिला राजगृह मुंडवा पुणे येथील कार्यरत सुरक्षा रक्षकांना एप्रिल २०१९ ते डिसेंबर २०२४ असे ५६ महिन्याचे मंडळाने निश्चित केलेल्या दराने वेतन मिळालेले नाही. तसेच त्यांना पीएफ, बोनस, रजा सुविधा मिळत नाही. तरी सदरचे वेतन व लाभ त्वरित देण्यात यावे.

५. सोलापूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळातील सुरक्षा रक्षकांना कायम नोंदणी क्रमांक व ओळख पत्र देण्यात आलेले नाही ते देण्यात यावे. तसेच ग्रामीण रुग्णालय सोलापूर येथील सुरक्षा रक्षकांना गेल्या ... महिन्यांचे वेतन अद्याप मिळालेले नाही. तरी सदर वेतन त्वरित मिळावे. संबंधित आस्थापनेकडून वेतन मिळेपर्यंत मंडळाकडून ८० % उचल देण्यात यावी.

६. ससून रुग्णालय पुणे येथील सुरक्षा रक्षकांना मे २०२३ ते मार्च २०२६ पर्यंतचे वेतना वरील फरक १० टक्के अधिभारासह अद्याप मिळाला नाही तो देण्यात यावा.

७. शासनाच्या विविध विभागात म्हणजे ग्रामीण रुग्णालय उपजिल्हा रुग्णालय आदी ठिकाणी काम करणाऱ्या सुरक्षा रक्षकांना नेहमीच चार - सहा महिने मिळत नाही. तरी दरमहाचे वेतन सात तारखेला मिळावे ही विनंती.

८. मंडळातील सर्व नोंदीत सुरक्षा रक्षकांना भविष्य निर्वाह निधी आणि ग्रॅच्युटी कायद्याच्या तरतुदी लागू करण्यात याव्यात. याबाबत नियम तयार करून ते लागू करण्यात यावे.

९. २७ मार्च २०२६ चा शासन निर्णय महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक नोकरीचे नियम आणि कल्याण अधिनियम १९८१ च्या तरतुदींचा भंग करणारा असल्याने तो रद्द करण्यात यावा. पोलीस विभाग मार्फत केली जाणारी भरती बंद करून ती मांडला मार्फतच करण्यात यावी.

१०. महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन आणि कल्याण ) योजना २०१९ खंड १९ नुसार नोंदीत प्रत्येक सुरक्षा रक्षकांना सेवा अभिलेख पुस्तिका देण्यात यावी. अनेक मंडळामध्ये अशी सेवा पुस्तिका नसल्याने सुरक्षा रक्षकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे.

११. महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन आणि कल्याण ) योजना २०१९ खंड ३२ नुसार सुरक्षा रक्षक मंडळांची शिस्त व गैरवर्तणूक संबंधातील कारवाईची नियमावली तयार करण्यात यावी. त्यानुसार सुरक्षा रक्षकांवर शिस्तभंगाची कारवाई व्हावी. सध्या किरकोळ कारणासाठी देखील सुरक्षा रक्षकांना महिना महिना दोन दोन महिने कामावरून दूर ठेवले जाते.

१२. महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन आणि कल्याण ) योजना २०१९ खंड १६ नुसार मंडळात कार्यरत असताना सुरक्षारक्षक काही कारणाने अपंग झाल्यास त्याबद्दल काय कारवाई करावी याबाबत कुठलेही नियम तयार केले नसल्याने सदर सुरक्षाकांची नोंदणी रद्द केली जाते. तरी खंड १६ नुसार नियमावली सर्व मंडळांमध्ये तयार करण्यात यावी.

१३. महाराष्ट्र सुरक्षा रक्षक मंडळातील सुरक्षा रक्षकांना मिळणारे गणवेश, चामडी बुट, पट्टा, रेनकोट खूप लवकर खराब होतात. तरी चांगल्या प्रतीचे टिकाऊ देण्यात यावे.

१४. राज्यातील विविध जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळातील सुरक्षा रक्षक यांच्या मूळ वेतनात 30 टक्के आधी घरभाडे भत्त्यात 30 टक्के एवढी वाढ करण्यात यावी. तसेच अन्य भत्त्यांमध्ये किमान २ हजार रुपये एवढी वाढ करण्यात यावी.

१५. सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांना वर्षाला किमान १६ दिवस पगारी रजा, ८ दिवस किरकोळ रजा आणि इएसआय लागू नसलेल्या सुरक्षा रक्षकांना ८ दिवस आजारपणाची रजा देण्यात यावी.

तरी या अडचणी व प्रश्न सोडवण्यात यावे. या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी स्वतंत्र बैठक आयोजित करण्यात यावी आणि त्यास आमच्या प्रतिनिधी निमंत्रित करावे ही नम्र विनंती.
धन्यवाद !

आपले

| | | |
|---|---|---|
| संदीप पाटील | कृष्ण साठे | अनिल पारधी |
| अध्यक्ष | कार्याध्यक्ष | सरचिटणीस |

।। श्रम ही आराधना ।।

# महाराष्ट्र राज्य सहकारी बँक कर्मचारी महासंघ

संलग्न : भारतीय मजदूर संघ (नोंदणी क्रमांक : ३९७३ / ०९)

२५, इब्राहिम मेन्शन, डॉ. आंबेडकर रोड, परळ, मुंबई - ४०० ०१२.

अध्यक्ष : ॲड. अनिल ढुमणे
मो. ९८५००९५०१७

सरचिटणीस : ॲड. बाळासाहेब कांबळे
मो. ९३५६७८८५९४

**जा.क्र.** **दि.**१६/०४ /२०२६

**प्रति**
**मा. नामदार श्री देवेंद्रजी फडणवीस,**
मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य
मंत्रालय मुंबई.

**मा. नामदार श्री बाबासाहेब मो. पाटील ,**
सहकारमंत्री महाराष्ट्र राज्य
मंत्रालय मुंबई.

**विषय - महाराष्ट्रातील सहकारी बँक कर्मचाऱ्यांचे विविध प्रलंबित प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी दिनांक 16 एप्रिल 2026 रोजी कामगार आयुक्त कार्यालयावर आयोजित केलेल्या मोर्चाच्या निमित्ताने निवेदन..**

**महोदय**

महाराष्ट्र राज्य सरकारी बँक कर्मचारी संघ ही राज्यातील सहकारी बँक कर्मचाऱ्यांची संघटना आहे. राज्यातील नागरी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, अंतरराज्य सहकारी बँका आदी विविध ११० बँकातील कर्मचारी अधिकारी या संघटनेचे सभासद आहेत.

महाराष्ट्रातील सहकारी बँक कर्मचाऱ्यांचे विविध प्रलंबित प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी दिनांक 16 एप्रिल 2026 रोजी कामगार आयुक्त कार्यालयावर आयोजित केलेल्या या मोर्चाच्या निमित्ताने सहकारी बँक कर्मचाऱ्यांचे विविध प्रश्नांकडे आम्ही आपले लक्ष वेधत आहोत. हे प्रश्न आपल्या माध्यमातून सुटावे अशी अपेक्षा आहे.

१. सर्व सहकारी बँक कर्मचाऱ्यांसाठी पाच दिवसाचा कामाचा आठवडा करण्यात यावा.
२. महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम आणि केंद्रीय सहकारी संस्था अधिनियम यामध्ये असलेल्या तरतुदीनुसार अनेक सहकारी बँकांच्या संचालक मंडळावर कर्मचारी प्रतिनिधी घेतले जात नाही हे घेण्यात यावे.
३. सहकारी बँकांमध्ये अनेक महत्त्वाची काम हे कंत्राटी पद्धतीवर दिले जातात. त्यातून बँकेला धोका संभवतो. बँक हे आर्थिक क्षेत्र असल्याने जबाबदारी निश्चित असावी म्हणून कंत्राटी पद्धत बंद करण्यात यावी आणि त्यासाठी कायम कर्मचारी नेमण्यात यावे .
४. सहकारी बँकांसाठी व्हिसल ब्लोर पॉलिसी अनिवार्य करण्यात यावी.
५. सहकारी बँकांमधील कर्मचाऱ्यांसाठी बोनस पात्रतेसाठी वेतन मर्यादा रु. 42000/- पर्यंत वाढवण्यात यावे.

।। श्रम ही आराधना ।।

# महाराष्ट्र राज्य सहकारी बँक कर्मचारी महासंघ

संलग्न : भारतीय मजदूर संघ (नोंदणी क्रमांक : ३९७३ / ०९)

२५, इब्राहिम मेन्शन, डॉ. आंबेडकर रोड, परळ, मुंबई - ४०० ०१२.

अध्यक्ष : ॲड. अनिल ढुमणे
मो. ९८५००९५०१७

सरचिटणीस : ॲड. बाळासाहेब कांबळे
मो. ९३५६७८८५९४


जा.क्र. ..२.. दि. / /२०

६. सहकारी बँकांमधील कर्मचाऱ्यांना दरमहा मिळणारी EPS -95 पेन्शन किमान 7500/- रुपये करण्यात यावी.

७. राज्यातील अनेक सहकारी बँका आजारी झालेल्या आहेत त्यांना राज्य सरकारने मदत करावी.

८. सहकारी बँकांची विश्वासार्हता टिकून राहावी आणि सहकार वाढावा या दृष्टीने संचालकांच्या गैरव्यवहाराची कडक चौकशी करून कारवाई करण्यात यावी.

९. सहकारी बँकांना आयकरातून सूट देण्यात यावी.

१०. सहकारी बँक कर्मचाऱ्यांचे निवृत्तीचे वय 60 वर्षापर्यंत वाढवण्यात यावे.

११. सहकारी बँक कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या भविष्य निर्वाह निधीची मर्यादा 30000/- पर्यंत वाढवण्यात यावी.

सहकारी बँक कर्मचाऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नाबाबत बैठक आयोजित करण्यात यावी आणि त्यावर चर्चा होऊन निर्णय व्हावा ही अपेक्षा. धन्यवाद !

आपले

ॲड अनिल ढुमणे
अध्यक्ष

बाळकृष्ण कांबळे
जनरल सेक्रेटरी

सुधांशू रानडे
उपाध्यक्ष

।। श्रम ही आराधना ।।

# पुणे मेट्रो रेल कामगार संघ

Redg. No: PN 5299 Dt. 10/09/2025

**संलग्न : भारतीय मजदूर संघ**

कार्यालयाचा पत्ता : १८५ शनिवार पेठ, विश्वकर्मा भवन, पुणे ४११०३० Email : bmspunemetro@gmail.com

अध्यक्ष : राम सुरवसे Mob. 9518551565

जनरल सेक्रेटरी : सचिन मेंगाळे Mob. 94220 37029


Ref.: संदर्भ : पुणे मेट्रो/मुख्यमंत्री/2026 /8407

Date : दि. 27/3/2026

प्रति,

मा. ना.देवेंद्रजी फडणवीस

मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य,मंत्रालय मुंबई

मा.ना. ॲड.आकाशजी फुंडकर

मा.कामगार मंत्री, महाराष्ट्र राज्य,मंत्रालय मुंबई -32

मा. कामगार आयुक्त,

महाराष्ट्र राज्य, बांद्रा कुर्ला संकूलबांद्रा मुंबई

मध्यवर्ती टपाल केंद्र मुख्यमंत्री सचिवालय महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ 27/3/26

लिपिक कामगार भवन कामगार आयुक्त यांचे मुख्यालय सी-२०, सीटी पार्क बायुंला, ... बँकेच्या मागे, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

संदर्भ :
1. संघटनेचे दि. 26/9/2025 , 20/10/2025, दिण 13/11/2025 रोजीचे मा.कामगार आयुक्त, मुंबई यांचे पत्र.
2. मा. अप्पर कामगार आयुक्त, पुणे विभाग, यांच्या कार्यालयातील बैठक दि. 21/11/2025 व दि. 27/11/2025,
3. दि. 17/12/2025 दि. 18/12/2025 रोजी मा. प्रधान सचिव यांना दिलेले पत्र.
4. दि. 21/1/2026 मा. प्रधान सचिव, कामगार विभाग यांना दिलेले पत्र
5. दि. 30/1/2026 चे मा. कामगार उपायुक्त यांनी मा. महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांना दिलेले पत्र
6. संघटनेचे दि.2/2/2026 चे मा.कामगार आयुक्त,महाराष्ट्र मुंबई
7. दि. 18/3/2026 चे संघटनेचे पत्र

**विषय : दि. 18/2/2025 रोजीच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी त्वरीत करणे बाबत व फरकासह सर्व लाभ सर्व कामगारांना मिळण्याकरिता दि. 16/4/2026 रोजी मा. कामगार आयुक्त महाराष्ट्र राज्य कार्यालय बी.के.सी बांद्रा मुंबई येथे लाक्षणिक मोर्चा**

महोदय,

या द्वारे आपणांस कळविण्यात येते की, व्यवस्थापनाचा पत्ता : **मा. व्यवस्थापकीय संचालक , महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. पुणे ऑफिस ए-2,ए-3 ब्लॉक ड्रिस्टीक कोर्ट,इंटर चेंज, मेट्रो स्टेशन, न्यायमुर्ती रानडे पत,शिवाजीनगर पुणे - 411005 Email:md@mahametro.org mail.pune@mahametro.or** या प्रकल्पात मेट्रो रेल्वे चालविण्याकरिता आवश्यक असणाऱ्या

O.C.

1

सर्व खात्यात नाममात्र कंत्राटी पध्दतीच्या माध्यमातुन हजारो कामगार सातत्याने व नियमितपणे कार्यरत असून पुणे मेट्रो रेल कामगार संघ रजि.5299 दि.10/9/2025 संलग्न भारतीय मजदूर संघ या संघटनेचे सभासद आहेत. सध्या या कामगारांना महाराष्ट्र राज्याच्या शॉप ॲक्ट प्रमाणे किमान वेतन मिळत आहे सदरील प्रकल्प रेल्वेच्या माध्यमातुन असून या प्रकल्पाला केंद्रीय वेतन श्रेणी दर लागु आहेत.

याबाबत मा. कामगार मंत्री महाराष्ट्र राज्यया अध्यक्षतेखाली भारतीय मजदूर संघ, व्यवस्थापन यांच्या समावेत झालेल्या बैठकीमध्ये केंद्रीय वेतन दर देण्याचे मान्य झालेला आहे. याबाबतचा शासन निर्णय दि. 18/2/2025 रोजी घोषित झालेला आहे. सदरील निर्णय फक्त नागपूर मेट्रो मधील कामगारांना लाभ मिळत आहे. या शासन निर्णयानुसार पुणे मेट्रो रेल कामगार संघ या संघटनेने अंमलबजावणी करण्याबाबत मेट्रो व्यवस्थापन, मा.मुख्यमंत्री कार्यालय, मा. कामगार मंत्री कार्यालय, मा. प्रधान सचिव कार्यालय, मा. आयुक्त कार्यालय, मा. अप्पर कामगार आयुक्त, कार्यालय पुणे यांच्याकडे वारंवार पाठपुरावा करून शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याची मागणी केलेली आहे. याबाबत मा.कामगार उपाआयुक्त पुणे यांनी लेखी पत्राद्वारे सूचना देवूनही अद्यापपर्यंत याची अंमलबजावणी केलेली नाही.

त्यामुळे संघटनना :

1. पुणे मेट्रो तील सर्व कामगारांना दि. 18/2/2025 रोजीच्या शासन निर्णयानुसार तदनुषंगिक सर्व फरकासह केंद्रीय वेतन दराचा लाभ देण्यात यावेत.
2. पुणे मेट्रोतील सर्व कामगारांना महाराष्ट्र रेल कॉपोरेशन मध्ये कायम नोकरीत समाविष्ट करण्यात यावे.

या मागणीकरिता पुणे मेट्रोतील कामगार दि. 16 एप्रिल 2026 रोजी मा.कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य कार्यालय, बांद्रा कुर्ला संकूल, बांद्रा मुंबई येथे लाक्षणिक मोर्चा काढणार आहेत याची कृपया आपण नोंद घ्यावी ही नम्र विनंती.

आपला

(सचिन मेंगाळे)
सरचिटणीस
Ph.9422037029

प्रत : पुढील कार्यवाहीकरिता
1. मा. अध्यक्ष/महामंत्री भामसं, महाराष्ट्र प्रदेश
2. मा. अध्यक्ष/महामंत्री विदर्भ प्रदेश

पुणे मेट्रो रेल कामगार संघ

# ठेकेदार कामगार संघ

(संलग्न : भारतीय मजदूर संघ)
रजि.नं. पी.एन. १५८४ दि. ३०/०४/१९८४
विश्वकर्मा भवन, १८५, शनिवार पेठ, पुणे – ४११ ०३०
फोन : ०२० – २४४५२०२० bms23july@gmail.com

संदर्भ : ठेकास/मुख्यमंत्री/2026/87A

दि. 27/3/2026

मध्यवर्ती टपाल केंद्र
मुख्यमंत्री सचिवालय
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
27/3/2026

प्रति,

मा. ना.देवेंद्रजी फडणवीस
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य,
मंत्रालय मुंबई

मा.ना. ॲड.आकाशजी फुंडकर
मा.कामगार मंत्री, महाराष्ट्र राज्य,
मंत्रालय मुंबई -32

मा. ना. अशिष शेलार
माहिती व तंत्रज्ञान मंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई

मा. कामगार आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, बांद्रा कुर्ला संकूल
बांद्रा मुंबई

लिपिक
कामगार भवन
कामगार आयुक्त यांचे मुख्यालय
सी-२०, सीटी पार्कच्या बाजुला,
...बँकेच्या मागे, बांद्रा-कुर्ला संकुल
बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

विषय : कामगारांना ऑक्टोबर, नोव्हेंबर डिसेंबर 2025 व जानेवारी फेब्रेवारी 2026 चे वेतन त्वरीत अदा करणे बाबत करिता दि. 16 एप्रिल 2026 रोजी मा.कामगार आयुक्त कार्यालय महाराष्ट्र राज्य, बांद्रा कुला संकूल, बांद्रा मुंबई येथे लाक्षणिक मोर्चा

महोदय

या द्वारे आपणांस कळविण्यात येते की, **व्यवस्थपनाचा पत्ता व फोन क्र.**

e- Governance Solutions Pvt. Ltd., Free Press Journal Marg, Nariman Point, Mumbai- Maharashtra - 400021,

1. The Director, Smt. Sushma Kanse , Shri. Umesh Pawar - Ph. 9870228870
   E- umesh.egov@gmail.com /
2. The Director - anil@gov2egov.com , Anil wororker - Ph. 8956962439
   The Project Manage- pmtpa@gov2egov.com
   H.R. Poonam Deshmane, Ph. 7900162221
   E-poonam.egov@gmail.com/poonam.deshmane@gov2egov.com/
   tpa.onm@gov2egov.com/ tpa.egov.@gov2egov.com
3. The Hon'ble Narendra Gedam - TCI Project Manager
   Email : narendra.gedam@tcil.net.in
4. The Hon'ble Makarand Kurtadikar - General Manager _ Maha IT
   E- makarand.kurtadikar@mahait.org

O.C.

1

या आस्थापनेमध्ये महाराष्ट्र शासनाच्या महिती व तंत्रज्ञान या विभागाद्वारे TCIL च्या माध्यमातुन महाराष्ट्र राज्यातील कलेक्टर ऑफिस, तहसिलदार कार्यालय, मध्ये TPA Engineer म्हणून शेकडो कामगार कार्यरत आहेत.

या कामगारांना पेमेंट ऑफ वेजेस अॅक्ट, पेमेंट ऑफ मिनिमम वेजेस अॅक्ट, पेमेंट ऑफ बोनस अॅक्ट तसेच सामाजिक सुरक्षा म्हणून भविष्य निर्वाह निधी योजना राज्य कामगार विमा योजना, औद्योगिक विवाद कायदा 1947 इत्यादी कामगार कायदे लागु आहेत.

महाराष्ट्रातील विविध ठिकाणी आस्थापनेतील काम करणाऱ्या कामगारांच्या वतीने कळविण्यात येते की, उपरोक्त आस्थापनेतील कामगारांना **ऑक्टोबर, नोव्हेंबर,डिसेंबर 2025 ते जानेवारी,फेब्रुवारी 2026** या कालावधीतील वेतन प्राप्त झालेले नाही. येथील कामगारांना सुमारे 23000 ते 25000 वेतन मिळत आहे. यामुळे पेमेंट ऑफ वेजेस अॅक्ट, पेमेंट ऑफ मिनिमम वेजेस अॅक्ट या कायदयांचा भंग झालेला आहे. व यामुळे कामगारांची अत्यंत आर्थिक अडचण निर्माण होवून उपासमार होत आहे.

1. सर्व कामगारांना **ऑक्टोबर, नोव्हेंबर,डिसेंबर 2025 ते जानेवारी,फेब्रुवारी 2026** या कालावधीतील संपूर्ण वेतन एकरकमी देण्यात यावेत.
2. भविष्य निर्वाह निधी योजना, ईएसआय योजना कामाला रूजु झाल्यापासून लाभ देण्यात यावेत.
3. कायदयाचे पालन न करणाऱ्या संस्था व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. या मागण्यांकरिता या आस्थापनेतील सर्व कामगार दि. 16 एप्रिल 2026 रोजी मा.कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य कार्यालय, बांद्रा कुर्ला संकूल, बांद्रा मुंबई येथे लाक्षणिक मोर्चा काढणार आहेत याची कृपया आपण नोंद घ्यावी ही नम्र विनंती.

आपला

**(सचिन मेंगाळे )**
**महामंत्री**
**मो.क्र. 9422037029**
**E-sachinmbms@gmail.com**

प्रत : पुढील कार्यवाहीकरिता
1. मा. अध्यक्ष/महामंत्री भामसं, महाराष्ट्र प्रदेश
2. मा. अध्यक्ष/महामंत्री विदर्भ प्रदेश

॥ न्याय,हक्कासाठी लढा ॥

# महाराष्ट्र राज्य लिपिक संघ

श्रमिक संघ नोंदणी क्रमांक पी.एन.5326 संलग्न भारतीय मजदूर संघ

Email- mhlipiksangh@gmail.com

मुख्य कार्यालय पत्ता- श्री.महेश नाळे द्वारा पंचवटी अपार्टमेंट, महादेव नगर रस्ता,लक्ष्मीनगर,फलटण- 415523

दिनांक   / ०४ /२०२६

प्रती,

मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब

मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य,मंत्रालय मुंबई ३२

प्रत व मार्फत

मा.महाराष्ट्र राज्य कामगार आयुक्त,

कार्यालयः बांद्रा (बी.के.सी.,पुर्व) मुंबई

**विषय :** -लिपिक संवर्गची प्रदीर्घ कालावधी पासून प्रलंबित असलेली वेतनातील त्रुटी दूर करणे या मागणी साठी भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेश यांच्या नेतुत्वात होणा-या दिनांक १६ एप्रिल २०२६ रोजीच्या आक्रोश मोर्चा मध्ये सहभाग बाबत.

महोदय

उपरोक्त विषया नुसार महाराष्ट्र राज्य शासन अंतर्गत लिपिक वर्गीय कर्मचारी (कनिष्ठ सहाय्यक / लिपिक, वरिष्ठ सहाय्यक /लिपिक) यांच्यावर चौथा वेतन आयोगापासून वेगवेगळे वेतन आयोग व वेतन त्रुटी समितीने वेतन वाढ / वेतन दुरुस्ती करताना लिपिक वर्गीय कर्मचारी (कनिष्ठ सहाय्यक / लिपिक, वरिष्ठ सहाय्यक /लिपिक) यांना दुर्लक्षित केले आहे.

भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेश यांच्या नेतुत्वात होणा-या दिनांक १६ एप्रिल २०२६ रोजीच्या आक्रोश मोर्चा मध्ये महाराष्ट्र राज्य लिपिक संघ सलग्न भारतीय मजदूर संघ सभागी होत आहेत.

**प्रलंबित मागण्या :-**

१. महाराष्ट्र राज्य शासन अंतर्गत लिपिक वर्गीय कर्मचारी (कनिष्ठ सहाय्यक / लिपिक, वरिष्ठ सहाय्यक /लिपिक) यांची चौथा वेतन आयोगापासून प्रलंबित वेतन त्रुटी दूर करावी.

२. पदोन्नतीचे टप्पे कमी करून कनिष्ठ सहाय्यक / लिपिक, वरिष्ठ सहाय्यक / लिपिक हे पद एकत्र (मर्ज) करून विकास सहाय्यक अधिकारी पद नाम देण्यात यावे.

३. विकास सहाय्यक अधिकारी नवीन पदाची वेतन श्रेणी एस – १० मंजूर करण्यात यावी.

सदर मागण्या मान्य न झाल्यास भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेश यांच्या नेतुत्वात अधिक तीर्व आंदोलन करण्यात यईल. तरी सहानुभूती पूर्वक विचार होऊन वरील मागण्या मान्य होण्यास विनंती आहे.

मुख्य सचिव

राज्य अध्यक्ष

देशहित ! उद्योगहित !! कामगारहित !!!

॥ श्रम ही आराधना ॥ र.नं. एन.एस.के./जे-९४८

# नगर परिषद-महानगरपालिका कर्मचारी महासंघ, महाराष्ट्र प्रदेश

संलग्न :- भारतीय मजदूर संघ

➤ विभागीय कार्यालय : 'श्रमिक भवन' जुने नगरपरिषद कार्यालय मागे, सुंदरनगर येवला जि. नाशिक 9673764600, 9270137047, 9226148955, 9421600855
Email : shravanjawale1962@gmail.com, yyashpatilyeola@gmail.com

➤ मुख्य कार्यालय : १८५, विश्वकर्मा भवन, शनिवार पेठ, पुणे, ४११०३० • दुरध्वनी : (०२०) २४४५४०४०,२४४५२०२० • फॅक्स (०२०) २४४८२८७८

जा.क्र. 92/2026 दि. 6/8/2026

## निवेदन

प्रति,

मा. ना. देवेंद्रजी फडणवीस साहेब,
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य,
मुंबई

यांचेकडेस -

**विषय : महाराष्ट्रातील नगरपरिषद व नगरपंचायत मधील कर्मचाऱ्यांचे विविध मागण्या बाबत दि. १६ एप्रिल २०२६ रोजी मुंबई येथे कामगार आयुक्त कार्यालयसमोर आक्रोश मोर्चा बाबत..**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये विनंतीपुर्वक निवेदन देण्यात येते की, महाराष्ट्रातील नगरपरिषद व नगरपंचायत मधील कर्मचाऱ्यांचे विविध मागण्याबाबत अनेकवेळा मा. आयुक्त कार्यालय, मुंबई व मा. नगरविकास विभाग, मुंबई यांचेकडे वेळोवेळी पत्रव्यवहार केला, धरणे आंदोलन केले व संबंधीत अधिकारी यांचे बरोबर बैठक होऊन सुध्दा कर्मचाऱ्यांचे प्रश्न अद्याप सुध्दा प्रलंबित आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील नगरपरिषद व नगरपंचायत मधील कर्मचाऱ्यांमध्ये मे. शासनाचे विरोधात असंतोषाचे वातावरण व संतापाची लाट निर्माण झालेली आहे.

नगरपरिषद व नगरपंचायत मधील कर्मचाऱ्यांच्या महत्वाच्या मागण्या खालीलप्रमाणे -

१) सन २००५ पासुन नगरपरिषद यांचा आकृतीबंध तयार आहे परंतु या बाबीकडे मे. शासन दुर्लक्ष करीत आहे. २१ वर्षे होऊन सुध्दा नवीन आकृतीबंध तयार झाला नाही तो तात्काळ तयार करण्यात यावा.

२) २००५ नंतरचे न. पा. कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना तात्काळ लागु करावी व नगरपरिषदेमधील त्यांचे हिश्शाची १४ टक्के रक्कम त्यांच्या खात्यावर जमा करावी.

३) २००५ नंतरच्या कर्मचाऱ्यांचे संवर्ग कर्मचारी व अधिकारी वर्गाप्रमाणे त्यांचे प्राणनंबर काढण्यात यावे.

४) सफाई कामगारांना श्रमसाफल्य योजनेमार्फत कामगारांना घरे बांधुन देण्यात यावी.

५) राज्य कर्मचाऱ्यांप्रमाणे नगरपरिषद कर्मचाऱ्यांना कालबध्द योजनेचा फरकाचा लाभ देण्यात यावा.

६) महाराष्ट्रातील नगरपरिषदमधील कंत्राटी कर्मचाऱ्यांना मे. शासनाच्या नियमानुसार किमान वेतन कायद्याप्रमाणे वेतन देण्यात यावे. व त्यांना सामाजिक सुरक्षा देण्यात यावी व दिवाळी सणाच्या वेळेस १ महीन्याचा बोनस देण्यात यावा.

७) महाराष्ट्रातील नगरपरिषद व नगरपंचायत मधील कंत्राटी कर्मचाऱ्यांचा ठेका हा मा. मुख्याधिकारी सो. यांचे मार्फत राबविण्यात यावा यासाठी बाहेरील ठेकेदार बोलवण्यात येऊ नये. यामुळे सर्व कंत्राटी कामगारांना किमान वेतन मिळू शकते.

८) राज्यातील नगरपरिषद व नगरपंचायत मधील सेवेत मयत झालेले वर्ग-३ व वर्ग-४ चे कर्मचाऱ्यांना अनुकंपा नियुक्ती तात्काळ देण्यात यावी. त्यासाठी स्थायी व अस्थायी पदाचा मतभेद करु नये.

.....२

९) महाराष्ट्रातील ज्या ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रुपांतर झालेले आहे त्या ठिकाणचे सफाई कामगारांना व इतर कामगारांना तात्काळ समावेशन करण्यात यावे. यासाठी पुर्वीची शैक्षणिक पात्रता ग्राह्य धरण्यात यावी व सफाई कामगारांचा आकृतीबंध तयार करण्यात यावा.

१०) १९९३ पुर्वीचे रोजंदारी सफाई कामगार न. पा. सेवेत कायम झालेले आहे त्यांना मे. लाड कमेटीच्या शिफारशीनुसार वारस हक्काचा लाभ देण्यात यावा. यापुर्वीच्या सफाई कामगारांना वारस हक्काचा लाभ दिलेला आहे. त्याप्रमाणे यांना देण्यात यावा.

११) नगरपरिषद व नगरपंचायत मधील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या थकीत रक्कमा २ ते ३ पासुन निधी अभावी मिळत नाही. त्यामुळे त्यांच्या कुटुंबाची उपासमार होत आहे. तरी थकीत रक्कमा तात्काळ देण्यात याव्या.

१२) राज्यातील नगरपरिषद व नगरपंचायत मधील कर्मचाऱ्यांचे वेतन दरमहा ५ तारखेस करण्यात यावे. कारण, ९५ टक्के लोकांनी विविध बँकेतुन कर्ज घेतलेले आहे. त्यांचे हप्ते वेळेवर न गेल्याने रिझर्व बँकेचे नियमानुसार त्यांना ब्लॅक लिस्ट मध्ये टाकण्यात येत आहे.

१३) राज्यातील नगरपरिषद मधील जे सफाई कामगार वर्ग-३ च्या पदासाठी शैक्षणिक पात्रता पुर्ण केले असेल अशा कर्मचाऱ्यांना दि. २४ फेब्रुवारी २०२३ च्या परिपत्रकाप्रमाणे वर्ग-३ च्या जागेवर नेमणुक द्यावी किंवा वर्ग-३ ची जागा रिक्त न नसल्यास त्यांना कामाच्या सोईने वर्ग-३ चे काम देण्यात यावे.

१४) नगरपरिषद व नगरपंचायत मधील कर्मचाऱ्यांना वैद्यकिस प्रतिपुर्ती मिळणे बाबत विलंब केला जातो. त्याबाबत स्वयंस्पष्ट आदेश पुन्हा पारित करण्यात यावे तसेच मे. शासनाने राज्यातील नगरपरिषद व नगरपंचायत मधील कर्मचाऱ्यांना कॅशलेस वैद्यकिस विमा योजना लागु करावी.

१५) नगरपरिषद व नगरपंचयात मधील वर्ग-३ व वर्ग-४ चे कर्मचारी सेवानिवृत्त झालेनंतर त्यांची सेवापुस्तक पडताळणी करणे बाबत पुर्वीप्रमाणे मा. मुख्याधिकारी यांना अधिकार देण्यात यावे. त्यामुळे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना लवकरात लवकर पेन्शन मिळेल व इतर रक्कमा सुध्दा वेळेवर मिळतील.

१६) नगरपरिषद व नगरपंचायत मधील सफाई कामगारांना सेवेत दाखल होतांना शैक्षणिक पात्रता पुर्वीप्रमाणे म्हणजे ४ थी पास असावी त्याबाबत मा. आयुक्त सो., नवीमुंबई यांना सुचित करण्यात यावे.

१७) नगरपरिषद मधील वेतन राखील निधी ३ महिन्याच्या वेतना इतका असावा असा मे. शासनाचा नियम आहे त्याप्रमाणे सर्व नगरपरिषदांना याबाबत तात्काळ सुचना देण्यात यावी. कारण, सहाय्यक अनुदान वेळेवर आले नाही तर यातुन न. पा. कर्मचाऱ्यांच पगार पेन्शन करणे सुलभ होते.

वरीलप्रमाणे नगरपरिषद व नगरपंचायत कर्मचाऱ्यांचा महत्वाच्या मागण्या बाबत आपले दालनात मा. आयुक्त तथा संचालक सो., नवीमुंबई, मा. प्रधान सचिव सो., नगरविकास विभाग, मुंबई मंत्रालय यांचे सोबत महासंघाचे पदाधिकारी बरोबर लवकरात लवकर बैठक घेण्यात यावी. त्यामुळे पुढील मागण्या लवकर पुर्ण होतील. सदर मागण्या आपल्या अधिकार कक्षात असल्याने आपल्या उपस्थितीत बैठक होणे गरजेचे आहे. या मागण्यासाठी आम्ही सर्व नगरपरिषद व नगरपंचायत मधील सर्व कर्मचारी व सर्व कंत्राटी कर्मचारी दि. १६ एप्रिल २०२६ रोजी बांद्रा मुंबई येथे कामगार आयुक्तालय कार्यालयासमोर मोठ्या संख्येने आक्रोश मोर्चात सहभागी होणार आहे याची नोंद घ्यावी ही नम्र विनंती.

आपले नमं

शशिकांत शांताराम मोरे
(प्रदेश संघटन सचिव)

श्रावण मोहन जावळे
(कार्याध्यक्ष)

प्रत माहितीसाठी रवाना –

१) मा. अनिल ढुमणे सो., अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य, भारतीय मजदूर संघ, महाराष्ट्र प्रदेश

जा.क्र. ११/२०२६. दिनांकः ०७/०३/२०२६.

**प्रति,**
**मा. ना. देवेंद्रजी फडणवीस साहेब,**
**मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य.**

**विषय :- राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी कामगारांच्या प्रलंबित व दुर्लक्षित असलेल्या मागण्यांबाबत.**

संदर्भ : १) मा. मुख्यमंत्री,आरोग्यमंत्री व केंद्रीय आरोग्य मंत्री यांना महासंघामार्फत देण्यात आलेले पत्र क्र १४/२३ दिनांक १५/०३/२०२३.
२) मा. सहसंचालक यांच्यासोबत महासंघाच्या प्रतिनिधींची झालेली बैठक दिनांक ०६/०७/२०२३ व प्राप्त झालेले इतिवृत्त.
३) मा. आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, मुंबई यांच्यासोबत नागपूर अधिवेशनामध्ये झालेली बैठक आणि त्यातील चर्चा दिनांक १३/१२/२०२३.
४) मा. केंद्रीय आरोग्य मंत्री यांच्यामार्फत मा. आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, मुंबई यांना देण्यात आलेल्या सूचना.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरून सविनय सादर करण्यात येते की, राष्ट्रीय आरोग्य अभियानामध्ये कार्यरत असलेले कर्मचारी हे सन २००५ पासून कार्यरत असून त्यांनी त्यांच्या आयुष्याच्या उमेदीचा काळ हा महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागामध्ये खर्च केलेला असून त्यांनी राज्याची कोविड सारख्या विषाणूच्या विळख्यातून सुटका करण्यामध्ये सिंहाचा वाटा उचललेला आहे आणि त्यास कोणताही प्रामाणिक माणूस नाकारू शकत नाही.

मागील १५ वर्षापासून सर्व कर्मचारी हे शासनाचे काम करीत असून त्यांच्या रास्त मागण्या संदर्भात वारंवार महासंघामार्फत पत्र दिलेली असून मा. आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांच्या कार्यालयाकडून सदरील मागण्यांकडे वारंवार आणि जाणूनबुजून दुर्लक्ष करण्यात येत असून कर्मचाऱ्यांच्या संघटनेच्या मागण्यांच्या पत्रांना केराची टोपली दाखविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कर्मचारी यांच्या खालील प्रमाणे मागण्या सादर करण्यात येत आहे.

# राष्ट्रीय ग्रामिण आरोग्य अभियान अधिकारी व कर्मचारी महासंघ
## महाराष्ट्र राज्य (भारतीय मजदूर संघ संलग्न)

रजि.नं.-एन.एम.के./एन-१४५०

सचिव
श्री सागर चव्हाण
९९६०५६८०८१

सहसचिव
श्री तुळजाप्रसाद कुलकर्णी
९७६४००५८१५

अध्यक्ष
श्री नंदकिशोर कासार
राष्ट्रीय उपाध्यक्ष AIH & NHM (भा.म.सं.)
८३२९९४१६५८

इमेल आयडी:- nhmunionmaha2019@gmail.com

सल्लागार
श्री दिपक कुलकर्णी
(भारतीय मजदूर संघ)

मार्गदर्शक
विभागीय कार्यक्रम व्यवस्थापक
(सर्व)

कायदेशीर सल्लागार
श्रीमती अॅड. सुकेशनी ढवळे

कार्याध्यक्ष
श्री जिवन कुलकर्णी
श्री अमोल महाडिक

उपाध्यक्ष
श्रीमती अलका विभुते

कोषाध्यक्ष
श्री विलास वाउडे

महिला प्रमुख
श्रीमती वैशाली थोरात

प्रसिद्धी प्रमुख
श्री गोपाल अंभोरे

संघटक
श्री बाळासाहेब वाघ
श्री सचिन धनगर

कार्यकारिणी सदस्य
सर्व जिल्हाध्यक्ष व
जिल्हा सचिव


**राष्ट्रीय आरोग्य अभियान अधिकारी/कर्मचारी एकत्रीकरण समिती महाराष्ट्र**
**आंदोलनातील मागण्या लेखी स्वरुपात पत्राद्वारे आश्वासित करणे व समायोजन प्रक्रियेचा कालबध्द कार्यक्रम जाहिर करावा असे न झाल्याने दि. १९/०८/२०२५ पासुन राज्यातील राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांचा "बेमुदत संप" ० न्याय मागण्या**

१) **राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत सर्व कर्मचारी यांचे १०० % समायोजन व प्रत्येक वर्षी ३०% प्रमाणे सार्वजनिक आरोग्य विभाग, ग्रामविकास विभाग, नगरविकास विभाग, वैद्यकिय शिक्षण व संशोधन विभागामध्ये करणे. तसेच, या विभागात रिक्त जागा कमी असल्यास आताच आपण महसूल विभागात नवीन आकृतीबंध निर्माण करुन वाढीव जागा भरण्याचा निर्णय घेतल्यानुसार महसूल विभागामध्ये सुध्दा अतांत्रिक पदांमध्ये लिपीक वर्गीय / पेशकार या पदावर सुध्दा सदरील पदांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कार्यक्रम सहाय्यक, डाटा एन्ट्री ऑपरेटर व लेखापाल या पदामधून भरता येतील. यामुळे सदरील कंत्राटी कर्मचारी यांना त्यांचा हक्काची नियमित नौकरी मिळेल व महसूल विभागात सुध्दा मनुष्यबळ वाढल्याने अतिरिक्त काम करणा-या कर्मचारी यांचा ताण कमी होण्यास मदत होईल.**

२) Performance Report नुसार (outstanding ०५%, Excellent ०४%, Good ०२%) मानधनवाढ न करता सरसकट दरवर्षी ८% व एकवेळची बाब म्हणुन सन २०२५-२०२६ मध्ये १०% प्रमाणे वार्षिक बाढ करावी.

३) ३ वर्ष व ५ वर्ष सेवा पुर्ण झालेल्या अधिकारी व कर्मचारी यांना लॉयल्टी बोनस पुर्ववत लागु करावा.

४) EPF व ESIC व ग्रॅज्युटी योजना १५५००/- त्यापेक्षा जास्त मानधन असणा-या सर्व कंत्राटी कर्मचारी यांना लागु करावी.

५) कर्मचारी यांना विमा संरक्षण (अपघाती मृत्यू करीता ५० लक्ष, अपंगत्व करीता २५ लक्ष, औषधोपचार करीता २ ते ५ लक्ष) प्रमाणे लागु करावे. दि. १४/०३/२०२४ पासून मृत्यू झालेल्या कर्मचारी यांना राज्य वेलफेअर फंडातून रु.५० लक्ष तात्काळ मदत जाहिर करावी.

६) वेतन सुसुत्रीकरण २०१६-१७ पुर्वी कार्यरत असलेले व २०१७ च्या नंतर नियुक्त झालेले कर्मचारी यांच्या मानधनातील तफावत दुर करावी. नविन वेतन सुसूत्रिकरण धोरण करणेत यावे.

७) कर्मचारी मुल्यांकन अहवाल Not Satisfactory असल्यास नैसर्गिक न्यायाच्या नियमानुसार सदर कर्मचाऱ्यास स्वतःची बाजु मांखण्याची संधी उपलब्ध करुन देणेबाबत परिपत्रक जारी करावे.

८) समुदाय आरोग्य अधिकारी बदली धोरणाप्रमाणे जिल्हा व आंतर जिल्हा बदली एकवेळची बाब म्हणुन सर्व NHM कर्मचारी यांना विनंतीप्रमाणे "बदली धोरण "लागु करावे.

९) कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांना अतिदुर्गम भागात काम करणा-या Hardship allowance व नक्षलग्रस्त भागाप्रमाणे सर्व भत्ते कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना लागु करावे.

१०) Pay Protection नियम नुसार मानधन संरक्षित करावे जुन्या कर्मचारी यांची नवीन ठिकाणी नियुक्ती झालेस लागु करावे.

११) नागपुर, गोंदिया व जालना जिल्हयातील सर्पोट स्टाफ समायोजन नियुक्ती आदेशाची अंमलबजावणी करावी, त्यांना तातडीने रिक्त पदावर हजर करुन घ्यावे. तसेच रुग्णवाहिका (२४X७ ) कंत्राटी वाहन चालक यांना शासकीय विभागात वाहन चालकाच्या रिक्त जागी विना अट समायोजन करण्यात यावे.


कार्यालय :- श्री नंदकिशोर कासार, प्लॉट नं १५, माला कॉम्प्लेक्स, जुना आग्रा रोड, संगमेश्वर, मालेगाव, ता. मालेगाव जिल्हा नाशिक

**सल्लागार**
श्री दिपक कुलकर्णी
(भारतीय मजदूर संघ)

**मार्गदर्शक**
विभागीय कार्यक्रम व्यवस्थापक
(सर्व)

**कायदेशीर सल्लागार**
श्रीमती ॲड. सुकेशनी ढवळे

**कार्याध्यक्ष**
श्री जिवन कुलकर्णी
श्री अमोल महाडिक

**उपाध्यक्ष**
श्रीमती अलका विभूते

**कोषाध्यक्ष**
श्री विलास वारुडे

**महिला प्रमुख**
श्रीमती वैशाली थोरात

**प्रसिद्धी प्रमुख**
श्री गोपाल अंभोरे

**संघटक**
श्री बाळासाहेब वाघ
श्री सचिन धनगर

**कार्यकारिणी सदस्य**
सर्व जिल्हाध्यक्ष व
जिल्हा सचिव


१२) राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत अधिकारी व कर्मचारी यांचे समकक्ष पद व समान शैक्षणिक पद समायोजनास नसेल तर या कर्मचारी यांच्या सेवा समायोजनासाठी वित्त विभागाचा शासन निर्णय दि. १५ जुलै २०२५ नुसार आकृतीबंध्द मध्ये नवीन पद निर्माण करावे.

१३) समायोजन प्रमुख मागणीचा कालबध्द कार्यक्रम जाहिर करावा व वरील १२ मागण्याच्या अनुषंगाने शासनस्तरावर तातडीने निर्णय घेऊन अंमलबजावणी करावी. वरील मागण्या तात्काळ मान्य करण्यात याव्या, मागण्या मान्य करण्यासाठी मा.आयुक्त कामगार कार्यालय, कामगार भवर, बी.के.सी., बांद्रा पुर्व मुंबई येथे दिनांक १६/०४/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा.पासून भव्य आंदोलन करण्यात येणार आहे.

**अध्यक्ष / सचिव**
**राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अधिकारी कर्मचारी महासंघ**
**महाराष्ट्र राज्य (भारतीय मजदूर संघ संलग्न)**

**प्रतः माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा.ना.आरोग्य मंत्री महाराष्ट्र मुंबई.
२) मा.आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
३) मा.प्रदेश अध्यक्ष/महामंत्री, भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेश.

# भारतीय टॅक्सी चालक संघ संलग्न-भारतीय मजदूर संघ

**नोंदणी क्र. : एच. ओ. थ्री. ९१०५**

२५, इब्राहिम मॅन्शन, डॉ. आंबेडकर रोड, परळ, मुंबई - ४०० ०१२. • फोन : २४७१३२८३, २४७०९५५८


**BTCS /**

**दिनांक :** 16/04/2026

**प्रति**

**मा. नामदार श्री देवेंद्रजी फडणवीस,**
मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य
मंत्रालय मुंबई.

**मा. नामदार श्री प्रतापजी सरनाईक ,**
परिवहन मंत्री महाराष्ट्र राज्य
मंत्रालय मुंबई.

**विषय – छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ मुंबई टॅक्सी चालकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी दिनांक १६ एप्रिल २०२६ रोजी कामगार आयुक्त कार्यालयावर आयोजित केलेल्या मोर्चाच्या निमित्ताने निवेदन..**

**महोदय**

भारतीय टॅक्सी चालक संघ ही नोंदणीकृत कामगार असणघ्त्ना असून **छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ मुंबई टॅक्सी चालकांचे नेतृत्व गात २५ वर्षापासून करीत आहे.**

**छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ मुंबई टॅक्सी चालकांचे** विविध प्रलंबित प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी दिनांक १६ एप्रिल २०२६ रोजी कामगार आयुक्त कार्यालयावर आयोजित केलेल्या या मोर्चाच्या निमित्ताने **छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ मुंबई टॅक्सी चालकांचे** विविध प्रश्नांकडे आम्ही आपले लक्ष वेधत आहोत. हे प्रश्न आपल्या माध्यमातून सुटावे अशी अपेक्षा आहे.

१. मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ वरील प्रीपेड टॅक्सी चे दर 2013 साली निश्चित करण्यात आलेले आहे. त्यानंतर ते पुनर्विरोधात करण्यात आलेले नाही. ते तातडीने पुनर्विधारित करण्यात यावे. त्यात भारतीय टॅक्स चालक संघाचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात यावी.

२. प्रीपेड टॅक्सी टॅक्सी काउंटरवर ऑनलाइन आणि रोख दोन्ही पद्धतीचे व्यवहार करण्याची सवलत उपलब्ध करून देण्यात यावी. परदेशी नागरिक अनेक वेळेला ऑनलाइन व्यवहार करू शकत नाही. त्यावेळेला रोख स्वरूपात रक्कम घेण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी.

३. ओला आणि उबर यासारख्या प्रायव्हेट टॅक्सी कंपन्यांचे काऊंटर ज्या परिसरात आहे त्याच परिसरात प्रीपेड टॅक्सीचे काउंटरही उपलब्ध करून देण्यात यावे.

४. प्रीपेड टॅक्सी काउंटर व्यवस्थापन चालवण्यासाठी टॅक्सी चालकांच्या सहकारी सोसायटीकडे देण्यात यावे.

५. ओला आणि उबर या गाड्यांना पार्किंग एरियामध्ये काउंटर देण्यात आलेले आहे. त्याच ठिकाणी प्रीपेड टॅक्सी काउंटर व गाड्या लावण्याची आणण्याची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात यावी. जेणेकरून ग्राहकांना सर्व प्रकारचे पर्याय उपलब्ध राहतील.

६. मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर मोठ्या प्रमाणावर टॅक्सी लागतात. वेटिंग काळ ही मोठा असतो. त्यामुळे प्रीपेड टॅक्सी पार्किंग साठी स्वच्छ जागा उपलब्ध करून देण्यात यावी. त्या ठिकाणी नियमित साफसफाई व्यवस्था असावी. पार्किंगच्या ठिकाणी स्वच्छ पिण्याचे पाणी, विश्रामगृह , उपहार गृह आदी आवश्यक व्यवस्था उपलब्ध करून देण्यात यावे.

७. मुंबईमध्ये टॅक्सी पार्किंगची मोठी समस्या आहे. नो पार्किंग एरियाच जास्त आहे. नो पार्किंग दंड मोठ्या प्रमाणावर आकारला जातो. शहरात पुरेसे टॅक्सी स्टँड उपलब्ध करून देण्यात यावे.

८. सिग्नल ओलांडणे , ओव्हर स्पीड , नो पार्किंग आदीसाठी आकारण्यात येणाऱ्या दंड हा अवाजवी आणि अन्यायकारक आहे. छोट्या छोट्या कारणांमुळे टॅक्सी चालकांना हा दंड भरावा लागतो. तो त्यांना परवडत नाही. दिवसभराची मजुरी यांची वाया जाते. तरी दंडाच्या कमी करून न्याय पद्धतीने आकारण्यात यावे.

मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ वरील प्रीपेड टॅक्सी चालकांच्या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नाबाबत बैठक आयोजित करण्यात यावी आणि त्यावर चर्चा होऊन निर्णय व्हावा ही अपेक्षा. धन्यवाद !

आपले

| | | | |
|---|---|---|---|
| राकेश मिश्रा | संतोष पुंडेकर | श्रीपाद कुटासकर | अविनाश खोत |
| अध्यक्ष | जनरल सेक्रेटरी | उद्योग प्रभारी | प्रदेश कार्यालय सचिव |

| National Organisation of Bank Workers | | National Organisation of Bank Officers |
|---|---|---|
| (An Industrial Federation of Bhartiya Mazdoor Sangh)<br>**Central Office: Dr. Munje Marg,**<br>**Congress Nagar, Nagpur, Maharashtra – 440012**<br>**GS Mob: 8318566738 Email: gsnobw22@gmail.com**<br>**President Mobile – gautam3972@zohomaol.in** | | (An Industrial Federation of Bhartiya Mazdoor Sangh)<br>**Regd. Office: Kasturi 371 – B**<br>**Shaniwar Peth, Pune, Maharashtra – 411030**<br>**GS Mob: 9446359172 Email: gsnobo1977@gmail.com**<br>**President Mobile – 8888219988,trupti.alti@gmail.com** |

Ref: LETTER/NOBW-NOBO/06/2026 Date: 06/04/2026

**Hon'ble Finance Minister,**
Government of India.
Ministry of Finance,
New Delhi.

Respected Madam,

